# शब्दांकुर

वार्षिकांक
२०१६-१७

RENUKA SHIKSHAN PRASARAK MANDAL, NAGPUR

## महिला विशेषांक



## रेणुका कॉलेज

बँक ऑफ इंडिया जवळ, बेसा, नागपूर-३७
Phone : 0710 - 3281455
E-mail : renukamv.ngp@gmail.com
Website : www.renukacollege.org

Scanned with OKEN Scanner

# भावपूर्ण श्रद्धांजली

आमचे प्रेरणास्थान



**स्व. श्री. एकनाथजी गेडाम**

संस्थापक, रेणुका शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर.

*Some People Born and Die*
*But Few of them Born to serve*
*Humanity and he was truly one of them*

# Renuka College


Near Bank of India, Besa, Nagpur-37


## B.A., B.Com., JUNIOR ARTS & COMMERCE COLLEGE


Phone : 0710- 3281455
E-mail : renukamv.ngp@gmail.com
Website : www.renukacollege.org




**Dr. Babanrao Taywade**
Principal, Dhanwate National College, Nagpur.



**Mr. Himanshu Gedam**
President, Renuka Shikshan Prasarak Mandal, Nagpur.



**Manjusha Gedam**
Secretary, Renuka Shikshan Prasarak Mandal, Nagpur.



**Dr. Jyoti Patil**
Principal, Renuka College Nagpur.


Scanned with OKEN Scanner

# शब्दांकुर

## वार्षिकांक २०१६-१७

## संपादकीय मार्गदर्शक मंडळ

### प्राध्यापक प्रतिनिधी



डॉ. प्रेमा चोपडे लेकुरवाळे
मुख्य संपादक



प्रा. रमणिक लेनगुरे
सह. संपादक



प्रा. अब्दुल शमीम
सह. संपादक

### विद्यार्थी प्रतिनिधी



सुप्रिया रामटेके, बी.ए. भाग-३



राहुल जाधव, बी.ए. भाग-३



आकाश चव्हाण, बी.ए. भाग-२



अश्विनी बोरेकर बी.कॉम. भाग-३



केशवी देशपांडे, बी.कॉम. भाग-१



हर्षा घोंगडे, बारावी कॉमर्स

# From Principal's Desk...

*"From women's eyes this doctrine I derive,*
*They sparkle still the right Promethean fire,*
*They are the books, the arts, the academes,*
*That show, contain, and nourish all the world"*
*-Shakespeare in Love's Labour's Lost.*



It is my absolute pleasure to see the fruits of the tiny seeds which we nurtured some years back. I am pleased to see that this time the college magazine "Shabdankur" comes with special thrust on Women's issues. Since the safety and security of women is more at stake today than in the previous century. But on the other hand our women are showing their mettle in all the fields. To name a few, Deepa Malik, P V Sindhu, Deepa Karmakar, Sakshi Malik and our women's hockey team who have brought laurels with silver and bronze medals at different competitions make us feel proud and confident for our bright future. Even in other areas women are proving themselves with full force brilliantly.

I sincerely appreciate the wholehearted motivation, unremitting encouragement and painstaking guidance of the editorial board specially Dr Prema Lekurwale Chopde, that is moulding these young minds and make the germinating grounds for creative and thoughtful ideas. I am sure this special issue will improv and empower the students in general to move forward positively in life and t express themselves freely. I extend my best wishes to the upcoming women-speci edition of "Shabdankur" which will be a good reading and learning experience f all the students as Shakespeare has chanted in King Lear:

*"Have more than thou showest,*
*Speak less than thou knowest,*
*Lend less than thou owest,*
*Ride more than thou goest,*
*Learn more than thou trowest,*
*Set less than thou throwest."*

**Dr. Jyoti Patil**
Principal
Renuka College,
Nagpur

Scanned with OKEN Scanner

# RENUKA COLLEGE

Near Bank of India, Besa, Nagpur-37

## LOCAL MANAGEMENT COMMITTEE 2014-2018

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Mr. Himanshu Gedam | - | Chairman |
| 2) | Mrs. Manjusha Manwatkar | - | Member |
| 3) | Dr. Narendra Dixit | - | Member |
| 4) | Dr. Kiran Nerkar | - | Member |
| 5) | Mr. Sanjay Bandre | - | Member |
| 6) | Dr. Pravin Patil | - | Member/Teacher |
| 7) | Prof. Kailash Fulmali | - | Member/Teacher |
| 8) | Prof. Ramnik Lengure | - | Member/Teacher |
| 9) | Mr. Mukesh Thakre | - | Member/Non Teaching |
| 10) | Prin. Dr. Jyoti Patil | - | Secretary/Principal |



## संपादकीय



सातत्याने प्रकाशित होणाऱ्या महाविद्यालयीन 'शब्दांकुर' २०१६-१७ या सत्राच्या विशेष वार्षिक अंकाचे संपादन करताना आम्हाला आनंद होत आहे. आजच्या काळामध्ये स्त्रीचे कर्तृत्व महान आहे. 'विशेष महिलांची कामगिरी' या विषयाचे औचित्य साधून या सत्रातील वार्षिकांकाचा केंद्रबिंदू 'कर्तबगार महिलांची भरारी' हा ठरवला आहे. यावर्षी ऑलिम्पिकमध्ये भारतीय महिलांची कामगिरी तसेच ऐतिहासिक, राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रांतील महिलांनी केलेल्या अमूल्य कार्यांना पुनर्उजळणी मिळावी आणि आजच्या नव्या युवा पिढीसमोर यावी, हा यामागचा उद्देश आहे. आमच्या रेणुका शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर संस्थेचे संस्थापक (Founder President) माननीय स्व. एकनाथजी गेडाम यांच्या विचारांनुसार शिक्षण आणि महिलांना मानसन्मान मिळावा, ही त्यांची दूरदृष्टी होती. हाच त्यांचा मुख्य उद्देश संस्था स्थापन करण्यामागचा होता आणि त्यांच्याच वाटेवर आम्ही मार्गक्रमण करीत आहोत.

वृत्तपत्रे, संदर्भग्रंथ तसेच इतर माहिती गोळा केल्यानंतर वाचन, चिंतन-मनन करून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी कर्तृत्ववान महिलांवर लेख व कविता लिहिलेल्या आहेत. आजवर अनेक महिलांनी संकटांतून मार्ग काढून, बुद्धी-कौशल्याने यशस्वीपणे वाटचाल करीत समाजात मानाचे स्थान मिळवले आहे. कर्तबगार महिलांनी आपल्या कर्तृत्वाने जगात वेगळी छाप उमटवली आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांत महिला आत्मविश्वासपूर्वक यशस्वी झाल्या आहेत. हा अंक वाचून त्यांच्याविषयीची माहिती विद्यार्थ्यांना कळेल आणि त्यातून प्रेरणा मिळेल, यात शंका नाही.

मी जरी संपादक असले तरीही वार्षिकांकाचे संपूर्ण श्रेय माझे एकटीचे नाहीत. 'शब्दांकुर'च्या यशस्वीतेसाठी रेणुका शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूरचे अध्यक्ष हिमांशू गेडाम, संस्थेचे सचिव मा. मंजूषा गेडाम, तसेच मा. प्राचार्य डॉ. ज्योती पाटील यांचेदेखील बहुमूल्य मार्गदर्शन व सहकार्य लाभल्यामुळे निर्धारित वेळेत वार्षिक अंकाचे प्रकाशन होऊ शकले, याबद्दल सर्वांचे शतशः आभार!

नाथे पब्लिकेशनचे श्री. संजय नाथे तसेच त्यांच्या सहकारी वर्गाबद्दलही मी रेणुका कॉलेजच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करते.

धन्यवाद!

सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

**डॉ. प्रेमा लेकुरवाळे चोपडे**
(मराठी विभाग प्रमुख)



**चला उभारा ती शुभ्र शिडे गर्वाने वरती,**
**कथा या खुळ्या सागराला.....,**
**अनंत अमुची ध्येयासक्ती,**
**अनंत अन आशा**
**किनारा तुला पामराला.....**

कवी - कुसुमाग्रज

# ....अनुक्रमणिका....


अ.क्र. लेख/कविता — पृष्ठ क्र.

**मराठी विभाग/हिंदी विभाग** ०५

१. स्त्रीचा एक आर्त स्वर ०६
२. आईचं प्रेम ०७
३. कांस्य पदक विजेती साक्षी मलिक ०८
४. आई, तुझी आठवण येते ०८
५. इथून दूर जाताना ०९
६. अंतराळवीरांगना सुनीता विलियम्स १०
७. आठवण १०
८. जगण्याचा अर्थ ११
९. उत्तम महिला वेटलिफ्टर कर्णम मल्लेश्वरी १२
१०. कधीच हार न मानणारी पी.व्ही. सिंधू १२
११. जीवनपुष्प १३
१२. भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील १४
१३. लावू चला वृक्ष १४
१४. शोधू कुठे १५
१५. अवकाशातील अजरामर तारा कल्पना चावला १६
१६. मुलगी जगली पाहिजे! १६
१७. रम्य पहाट
१८. स्वातंत्र्योत्तर काळातील प्रभावी महिला श्रीमती इंदिरा गांधी १७
१९. महिलांसाठी प्रेरणादायी ज्योत सरोजिनी नायडू १९
२०. प्रतिकार २०
२१. जगातील आठवे आश्चर्य डॉ. हेलन केलर २१
२२. पतंग उडवू चला... २२
२३. मतिमंद मुलांकडे समाजाचे लक्ष वेधणाऱ्या मारिया मॉंटिसरी २३
२४. आदिवासी बालकांच्या माता अनूताई वाघ २४
२५. माय मराठी २४
२६. थोर समाजसुधारक पंडिता रमाबाई २५
२७. आयुष्य २६
२८. फिर भी मेरा भारत महान २६
२९. अनाथांची माई सिंधूताई सपकाळ २७
३०. भारताची सुवर्णकन्या पी. टी. उषा २८
३१. निर्भय, साहसाचे दुसरे नाव सावित्रीबाई फुले २९
३२. यह खून कहो किस मतलब का ३०
३३. पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या प्रवर्तक ताराबाई मोडक ३१
३४. भारतातील पहिल्या डॉक्टर आनंदीबाई जोशी ३२
३५. उत्कृष्ट विचार ३३
३६. खूब लड़ी मर्दानी... झाशीची राणी लक्ष्मीबाई ३४
३७. खबर नहीं उसको ३५
३८. माँ का प्यार ३५
३९. कर्तबगार आणि दानशूर अहिल्याबाई होळकर ३६
४०. बसन्त ३७
४१. विदर्भातील अलौकिक रत्न राजमाता जिजाऊ ३८
४२. वृद्धाश्रम ३९
४३. कितना सच? ३९
४४. एशियाई गोल्ड मेडल विजेता शानदार मेरी कोम ४०
४५. पेड़-पौधों से रिश्ता-नाता ४१
४६. प्रयास करो, तमाशा मत देखो... ४१

**इंग्रजी विभाग**

४७. An Angel of Mercy MOTHER TERESA ४२
४८. Simplicity thou Name Albert Einstein ४३
४९. Importance of Home Sweet Home ४४
५०. Happy Womens Day ४४
५१. Act of Kindness ४५
५२. Fun with Science ४६
५३. Definition of Time ४६
५४. Sow Seeds of Love and Affection ४७
५५. Few Famous Quotes on Friendship ४८
५६. That's the Beauty of Human Relation ४८
५७. The Parts of Speech Poem ४८
५८. राष्ट्रीय सेवा योजना विभागाची वाटचाल ४९
५९. महाविद्यालयीन ग्रंथालय ५०
६०. महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग ५२
६१. सांस्कृतिक कार्यक्रम अहवाल २०१६-१७ ५३
६२. महिला सेल विभागाचे उपक्रम/'विशेष प्राविण्य' पुरस्कार ५४
६३. विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा ५५
६४. महाविद्यालयात कार्यक्रमांचे आयोजन ५६






# स्त्रीचा एक आर्त स्वर

**'सांगती वारसा जिजाऊंचा**
**लेकी आहेत सावित्रीच्या**
**माणुसकीचा झरा पाझरे**
**हृदयी सिंधू, साधनेचा'**

प्रेरणादायी अशा या कवितेच्या ओळींचे स्मरण करून, 'स्त्रीचा एक आर्त स्वर' या विषयावर आपले विचार मांडणे एक मुलगी म्हणून अभिमानास्पद वाटते. प्रस्तुत विषयावर विचार शब्दबद्ध करण्यापूर्वी सृष्टीतील मानवजातीचे अस्तित्व, त्यातील स्त्री-पुरुषांचे स्थान व त्यातही स्त्रीजातीचे अस्तित्व यांवर प्रकाश टाकणे गरजेचे आहे.

आई, बहीण, पत्नी, मुलगी, आत्या, काकू, मामी, वहिनी अशा अनेक प्रकारची भूमिका पार पाडणारी एक अद्भुत शक्ती म्हणजेच स्त्री. तिच्या अस्तित्वाशिवाय जगाचे अस्तित्व शून्य आहे. पण, तरीही आज स्त्रियांविषयी आपण वर्तमानपत्रांतून जे काही वाचतो, अनुभवतो, ते अतिशय घृणास्पद आहे. जिला आपण जन्मदात्री म्हणतो, तिच्या जन्माबद्दल इतकी उदासीनता का? सगळेच विचित्र आहे! जिला आपण आपल्या घरातील अन्नदात्री म्हणतो, का निघतात तिच्या अब्रूचे भरचौकात धिंडवडे? खरंच, विचार करून डोकं फिरायची वेळ आली आहे. या सगळ्या किळसवाण्या प्रकाराचा आता तिटकारा येतो आहे. वाटतं नको हे जगणं, जेथे स्त्रीला मोकळा श्वास घेणेही अशक्य झाले आहे!

**अहो, आई पाहिजे, बहीण पाहिजे,**
**पत्नीही पाहिजेच,**
**मग, मुलगी का नाही?**

असं म्हणतात, एक मुलगा शिकला की तो आपल्या घराण्यालाही शिक्षित करतो. पण, कुणी हे लक्षात घेत नाही की एक मुलगी शिकली तर ती सासर आणि माहेर या दोन्ही घराण्यांना शिक्षित करते. एकीकडे समानतेचे धडे आपण गिरवतो आणि दुसरीकडे मात्र पहिला मुलगाच हवा. वंशाला दिवा मिळेल, अशी आशा बाळगतो. यात कुठली आली हो समानता! आज आपण सर्वत्र बघितले तर असे लक्षात येईल की, स्त्रियांची प्रत्येक क्षेत्रात सरशी आहे. आकाशालाही गवसणी घालण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. पण, मनात नेहमी एक प्रश्न घर करून राहतो. एकविसाव्या शतकाची वाटचाल सुरू असूनही पुरुषप्रधान संस्कृतीचा वारसा का? घरातील मुख्य म्हणून तिचा विचार का केला जात नाही?

''ज्या देशात गुढ्या-तोरणांनी दारे शृंगारली जातात, त्या देशात स्त्री अजूनही गुलाम आहे.''

अहो, जिला घरात सन्मान मिळत नाही, तेव्हा तिने बाहेरच्या जगाकडून थोडी अपेक्षा ठेवली तर




Scanned with OKEN Scanner

स्त्रियांच्या कुशी? पण नाही, हेही धोका मान्य नाही आणि त्या गर्भातून मुक्त होतो [illegible] आणि [illegible] होते ती फक्त एक स्त्रीची [illegible] काय म्हणावं! [illegible] लोक स्त्रियांकडे [illegible] [illegible] हे काय कुणाला सन्मान देतील? [illegible] करून पुन्हा 'ही [illegible]' असा दावा करतात आणि [illegible] झाली [illegible] तो फक्त एक स्त्रीचा! तिच्या [illegible] तिचे दुःख राहिले दूरच. पण तिला [illegible] म्हणून हेच समाजकंटक [illegible] [illegible] होतात. पण उरते तो फक्त मृत्युरूपी अंधार!

'कुंपणानेच शेत खावे
सत्यालाही कलंकित करावे
चार भिंतींच्या आत तिला बेअब्रू करावे
आणि तिने स्वतःच मुके व्हावे
देणाऱ्या क्षणोक्षणी

मी कोण? माझे अस्तित्व काय? मी खरंच सुरक्षित आहे का? असे अनेक प्रश्न नेहमी प्रश्नच बनून राहतात. मिळतील का हो कधी या प्रश्नांची उत्तरे? ज्यामुळे स्त्रीचे मीपण जपले जाईल. तिच्या इच्छांची अशीच अमानुष हत्या होत राहील का? हे कुठेतरी थांबायला हवं. अहो पण थांबवेल कोण? ज्याच्यावर विश्वास ठेवतो, तोच जर त्याला गालबोट लावत असेल तर मग झालंच! पण आता खूप झालं! आता हे आणखी नाही! आता माझ्या मीपणाचे संरक्षण हे मलाच करावे लागेल. त्याशिवाय गत्यंतर नाही.

स्त्रियांचे जगणे हे फक्त चार भिंतींत नसून या संपूर्ण आसमंतात आहे, याची जाणीव आता हळूहळू निर्माण होत आहे. स्त्रीशक्तीचाही कणा ताठ होत आहे. फक्त गरज आहे ती तिला प्रेरणा देणाऱ्या सहकाऱ्यांची. यासाठी आपला दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. तेव्हाच स्त्री ही गुलामगिरीतून मुक्त झाली, असे म्हणता येईल.

'आयुष्याच्या या नव्या वाटेवर
मी चालते आहे
घाट-माथा, डोंगर-दऱ्या
यांचीही मला साथ आहे
नसेल समाजाचे पाठबळ तरी चालेल
फक्त स्त्रियांनी तरी एकमेकींकरिता लढावे
आता एवढीच अपेक्षा आहे.'

ज्याप्रमाणे एखादी फुलाची कळी अनेक पाकळ्या घेऊन उमलते, त्याचप्रमाणे एक स्त्री नानाविध रूपे घेऊन जन्माला येते; पण जन्माला येण्यापूर्वी या निरागस, निष्पाप कळीला जर मुळापासून खुडून टाकले तर तिच्या विविध छटा कशा दिसणार?

- केशवी देशपांडे
बी.कॉम. भाग-१ (इंग्लिश)

## आईचं प्रेम

किती गं तुझी रूपं...
किती गं तुझी माया...
हळूच हसून समजून घेतेस..
हळूच हसून मला समजावतेस..
काय चांगले, काय वाईट..
याची जाणीव करून देतेस..
मनाला माझ्या ओळखतेस
शब्दांत किती गोडवा तुझ्या
हृदयात भरपूर प्रेम
या प्रेमळ मायेने
मला नेहमी खेळवतेस
तुझ्याच या प्रेमाने झाले
माझे जीवन समृद्ध
तुझ्या या न संपणाऱ्या प्रेमाने
मी झालो आहे तृप्त..
किती गं 'आई' तुझी रूपं..
किती गं तुझी माया...!



- कविता कुशवाह
बी.कॉम. भाग-३





## कांस्य पदक विजेती
# साक्षी मलिक

रिओ ऑलिम्पिक स्पर्धेतील कांस्यपदक विजेती कुस्तीपटू साक्षी मलिकची हरयाणा सरकारने 'बेटी पढाओ, बेटी बचाओ' मोहिमेंतर्गत 'सदिच्छा दूत' म्हणून नेमणूक केली. साक्षी हिचे ब्राझीलहून मायदेशात आगमन होताच दिल्ली आणि लगेच हरयाणात तिच्या स्वागतासाठी क्रीडा चाहत्यांची झुंबड उडाली होती. दिल्लीत इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहाटे तिचे आगमन झाले असता साक्षीची एक झलक पाहण्यासाठी लोकांनी तुंबळ गर्दी केली होती. भविष्यातही भारताला अधिक पदके मिळवून देण्यासाठी तुमच्याकडून असाच पाठिंबा मला हवा आहे. 'बेटी पढाओ, बेटी बचाओ' या अभियानात आता 'बेटी खिलाओ' हे वाक्यही जोडण्याची गरज आहे. जेणेकरून अधिकाधिक मुली क्रीडा क्षेत्राकडे वळतील, अशी प्रतिक्रिया साक्षीने दिली. यावेळी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांनी पारंपरिक पगडी घालून साक्षीचा सत्कार केला, तसेच तिला 2.5 कोटी रुपयांचा धनादेशही देण्यात आला.

साक्षीचे हरयाणातही जंगी स्वागत करण्यात आले. दिल्ली विमानतळावर तिचे पहाटे आगमन झाले, त्यावेळी तिच्या स्वागतासाठी हरयाणातील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचे मंत्री, हरयाणाचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री अनिल विज उपस्थित होते. त्यानंतर साक्षी झज्जर जिल्ह्यातील बहादूरगडसाठी रवाना झाली. तिथे हरयाणाचे मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांच्यासह वरिष्ठ कॅबिनेट मंत्री कॅप्टन अभिमन्यू आणि ओ. पी. धनकर यांनी साक्षीचे स्वागत केले. आपल्या देशातील मुलींनी ऑलिम्पिक स्पर्धेत केलेल्या चमकदार कामगिरीचा आम्हाला अभिमान आहे. 'साक्षी मलिक आणि पी. व्ही. सिंधू' यांनी देशाला अभिमान वाटेल, अशी कामगिरी केली आहे, असे खट्टर म्हणाले.

रिओ ऑलिम्पिकची कांस्यपदक विजेती महिला कुस्तीपटू साक्षी मलिक हिचे मायदेशात आगमन होताच तिचे जल्लोषात स्वागत झाले. इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर साक्षीची एक झलक पाहण्यासाठी हजारो लोकांनी गर्दी केली होती. तिचे आई-वडील आणि नातेवाईकदेखील यावेळी उपस्थित होते.

साक्षीने कांस्यपदक दाखवत चाहत्यांना अभिवादन केले. अनेक महिन्यांनंतर आप्तेष्टांना बघितल्यावर साक्षी काही वेळ भावुक झाली होती. तिने वडिलांना मिठी मारली आणि त्यांना कांस्यपदक दाखवले, त्यावेळी त्यांचे डोळे पाणावले. ती म्हणाली, माझे कुटुंब फार भावुक आहे. मला पाहून त्यांना अत्यानंद झाला. मला प्रेरणा देणारे माझे कुटुंबीय,



Scanned with OKEN Scanner

प्रशिक्षक आणि सहकारी मल्लांची मी आभारी आहे. माझे कुटुंबीय आणि प्रशिक्षक यांनी माझे स्वप्न साकारण्यास फार मदत केली. सुशील आणि योगेश्वर दत्तासारख्या दिग्गजांनी मला प्रेरणा दिली. भारताची ध्वजवाहक होणे माझ्यासाठी गौरवपूर्ण बाब होती. राष्ट्रपती भवनातील खेलरत्न पुरस्कार वाटपाच्या वेळी तिच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. ती म्हणाली, 'इतक्या आत्मीयतेने स्वागत

... लोकांनी माझा उत्साह वाढवल्याचे पाहून आनंद झाला. एवढ्या लोकांनी माझ्यासाठी प्रार्थना केल्यामुळे मी पदक जिंकू शकले. ऑलिम्पिक पदक जिंकणे माझे स्वप्न होते. त्यासाठी मी कठोर मेहनत घेतली. पदक मिळाल्यानंतर स्वप्नवत वाटत आहे.'

**- रोशनी बैधावार**
बी. ए. भाग - १

# आई, तुझी आठवण येते



आई, तुझी आठवण येते
सुखद स्मृतींच्या कमोळांनी काळीज काजळते ।। धृ ।।
वात्सल्याचा कुठे उमाळा, तव हातांचा नसे जिव्हाळा
हृदयाचे मम होऊन पाणी, नयनी दाटून येते ।। १ ।।

तुजविण आई जगी एकटा, पोरकाच मज म्हणती करंटा
व्यथा मनीची कुणास सांगू, काळीज तिळतिळ तुटते ।।२ ।।
हाक मारतो आईSSआईSS, चुके लेकरू सुन्या दिशाही
तव बाळाची हाक माऊली, का नच कानी येते ।। ३ ।।

सुजल्या नयनी पुरले पाणी, सुकल्या कंठी उमटे वाणी
मुके पाखरू पहा मनाचे, जागी तडफड करते ।। ४ ।।
नको जीव हा, नकोच जगणे, आईवाचून जीवन-मरणे
एकदाच मज होई जवळी, पुसूनि लोचने माते ।। ५ ।।

**- राहुल कवटेश्वर**
बी.कॉम. भाग-१

# इथून दूर जाताना

...न दूर जाताना...
...न दूर जाताना
...ी आठवण तुझी असेल
...ऱ्या आठवणींचाच
...ा, हृदयात गाव वसेल
... दूर जाताना
...ारखं माझ्याजवळ
...शिवाय आहे तरी काय?
...गींचे शब्द हे जणू
दुधावरची साय आहे
इथून दूर जाताना
माझ्या आठवणी खरोखर
तुझ्या काळजात भिडतील काय?
माझ्या आठवणीत खरोखरच
तुझे डोळे रडतील काय?
इथून दूर जाताना
खूप काही दाटून येतंय
आठवणीच्या प्रवाहात मन
बर्फासारखं गोठून जातंय
इथून दूर जाताना
माझ्या साऱ्याच आठवणी
तुझ्या मनात उरतील काय?

**- पूनम शरणागत**
बी.कॉम. भाग-१





## अंतराळवीरांगना
# सुनीता विलियम्स

अमेरिकेची नेव्हल ऑफिसर आणि 'नासा'ची अंतराळवीरांगना म्हणून सुनीता विलियम्सचे नाव जगप्रसिद्ध आहे. सुनीता म्हणजे सुनी ही भारतीय वंशाची आहे. कल्पना चावलानंतर 'नासा'मध्ये अंतराळ संशोधन कार्यासाठी निवड झालेली भारतीय वंशाची ती दुसरी अंतराळवीरांगना होय. तिने अंतराळ प्रवासाबाबत तीन रेकॉर्डस् केले आहेत. पहिला- १९५ दिवसांचा अंतराळ प्रवास, दुसरा -अंतराळात चार वेळा स्पेस वॉकचा विक्रम आणि तिसरा- २९ तास आणि १७ मिनिटे स्पेस वॉकचा साधलेला विक्रम, ही खरोखरच अतुलनीय गोष्ट आहे. अमेरिकेच्या १५ व्या अंतराळमोहिमेसाठी तिला पाठवण्यात आले होते.

मॅसॅच्युसेट्समधील नीडहॅम येथे ती राहत असे. दीपक पंड्या आणि बॉनी पंड्या हे तिच्या आई-वडिलांचे नाव आहे. वडील व्यवसायाने न्यूरोॲनॉटॉमिस्ट होते. वडिलांबरोबर गुजरातमध्ये आल्यावर ती भारत पाहत असे. तिचा विवाह मायकेल विलियम्स यांच्याशी झाला. धावणे, पोहणे, बर्फावर खेळणे, मोटार सायकल चालवणे इत्यादी तिचे छंद होते. आंतरराष्ट्रीय अवकाश केंद्रावरून (ISS) उड्डाण करताना सुनीताने आपल्याबरोबर भगवद्गीता, गणेशाचा फोटो नेला होता.

१६ एप्रिल, १९०५ रोजी सुनीताने पहिल्यांदा स्पेस वॉक केला. बोस्टन मेरॉथॉनमध्ये तिने ४ तास २४ मिनिटे धावण्याचा विक्रम केला. जून १९९८ मध्ये नासा येथे तिची निवड झाली. ऑगस्ट १९९८ पासून तिचे प्रशिक्षण सुरू झाले. यामध्ये शारीरिक शिक्षण, टी- ३८ उड्डाण प्रशिक्षण, अंतराळात जिवंत राहावे म्हणून शिकावयाची तंत्रे, अंतराळातील सूचना, आंतरराष्ट्रीय अवकाश केंद्र प्रणाली, प्रवास, वैज्ञानिक आणि तांत्रिक माहिती इत्यादींचा समावेश तिच्या प्रशिक्षणात करण्यात आला. मे २००२ मध्ये पाण्याखाली कसे राहावे, याबाबतचे तिने प्रशिक्षण घेतले. अंतराळात पहिल्या मोहिमेत गेल्यानंतर तिने रोबोटिक्सचेही प्रशिक्षण घेतले.

STS-११७ या अंतराळ प्रवाशांबाबतीत तिने विशेष तज्ज्ञ म्हणून काम पाहिले. STS-११६ या स्पेस शटलमधून तिने उड्डाण केले. एप्रिल २००७ मध्ये रशियाच्या सदस्यांनी थोडा बदल करून १५ वी मोहीम आखली. २२ जून, २००७ रोजी ती पृथ्वीवर परत आली, तेव्हा STS-११६ मध्ये आठ दिवस अंतराळात राहण्याची पहिली विशेष कामगिरी तिने बजावली.

३१ जानेवारी, ४ फेब्रुवारी आणि ९ फेब्रुवारी २००७ रोजी तिने अल्जेरियाच्या मायकेल लोपेझबरोबर ISS बरोबर अंतराळात चालण्याची कामगिरी पूर्ण केली. तिसऱ्यांदा स्पेस-वॉकमध्ये ती ६ तास ४० मिनिटे अंतराळात होती. तिन्ही



Scanned with OKEN Scanner

स्पेसवॉकसाठी तिला नऊ दिवस लागले. यानंतर १९५ दिवस अंतराळात राहण्याचा विक्रम करून सुनीता कॅलिफोर्नियातील एअर फोर्स केंद्रावर परत आली. हे अवकाशयान जमिनीवर उतरल्यानंतर अमेरिकेच्या एबीसी या दूरचित्रवाहिनीने सुनीताची 'आठवड्याची व्यक्ती' ( Person of the week) म्हणून निवड केली.

अंतराळात २९ तास १७ मिनिटे स्पेस वॉक करून सुनीता विलियम्सने तिच्या पूर्वीच्या स्त्री अंतराळवीराचा रेकॉर्ड मोडला. आपण केवळ अंतराळात चालत नाही तर धावतोसुद्धा! हे तिने सिद्ध करून दाखवले. २२ जून, २००७ रोजी अंतराळ यान पृथ्वीवर परत आले. सुनीता विलियम्स ही आधुनिक काळातील वीरांगनाच म्हणावी लागेल!

- **रोशनी चव्हाण**

वर्ग १२ वा (वाणिज्य)

# आठवण

नाही बोलली ती काही
नाही हसली पाहून
तरी येते आठवण
तिची राहून राहून ।। १ ।।



नजरेचा तीर खोल
रुतला या काळजात
मनी भरून राहिला
बहरला पारिजात ।। २ ।।

- **प्रियंका मोहळे**

बी.ए. भाग-२




अंधाऱ्या खोलीत सापडली एक मेणबत्ती
अन् वदू लागली जीवनाचं गुपित
जगण्याचा अर्थ हरवलेल्या मनाचे
स्वत:च सोडवू लागली गणित
म्हणे, दिव्याखाली अंधारच असतो
म्हणून ज्योतीनं जळायचं नाही का?
पारिजातकाचा बहर दुसऱ्यांसाठीच असतो
म्हणून रोप रुजवायचंच नाही का?
कितीतरी मोलाचा हा संदेश
तिनंच मला दिला
पण देण्यासाठी (देण्यापेक्षा) मोठेपणा तिचा
तिच्या कृतीतूनच जाणवला
दुसऱ्याला प्रकाशात नेण्यासाठी
तिने स्वत:चा अंतच ओढवून घेतला
त्याच क्षणी माझ्याही मनाला
जगण्याचा अर्थ समजला
उजेडात तिची दखल कोणीसुद्धा घेत नाही
तरीही अंधारात ती साथ सोडून देत नाही
हाच तिचा स्वभाव माझ्याही मनाला भावला
अन् हरवलेल्या मनाला जगण्याचा अर्थ गवसला!

- **स्वाती कायरकर**

बी.कॉम. भाग-२





## उत्तम महिला वेटलिफ्टर
# कर्णम मल्लेश्वरी

कर्णम मल्लेश्वरी ही आंध्र प्रदेशची रहिवासी असून, तिचा जन्म १९७५ या वर्षी श्रीकाकुलम येथे झाला. मल्लेश्वरी यांचे वडील रामदास हे रेल्वे सुरक्षा दलात पोलिस आहेत.

सिडनी ऑलिम्पिक स्पर्धेत वेटलिफ्टिंगमध्ये ६९ किलो वजन उचलून मल्लेश्वरी हिने कांस्यपदक मिळवले. कर्णम मल्लेश्वरी हिचे नाव भारतात 'उत्तम वेटलिफ्टर महिला' म्हणून प्रसिद्ध आहे. तिने या क्षेत्रात जेव्हा पदार्पण केले, तेव्हा तिचे वय अवघे १५ वर्षांचे होते. तिने वेटलिफ्टिंग स्पर्धेत २५ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सुवर्णपदके जिंकली आहेत. आशियाई स्पर्धेत तिला कांस्यपदक मिळाले. १९९६ या वर्षी तिला 'राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार' प्राप्त झाला. १९९९ या वर्षी भारत सरकारतर्फे 'पद्मश्री'ने सन्मानित करण्यात आले. इ. स. २००० या वर्षी तिला 'साऊथ एशियन ऑफ दी इअर' हा पुरस्कार मिळाला. वयाच्या ४८ व्या वर्षी एवढी पदके जिंकणारी ती एकमेव महिला आहे.

मल्लेश्वरी या नावात दोन शब्द आहेत. मल्ली + ईश्वरी. मल्ली म्हणजे चमेलीचे फूल व ईश्वरी म्हणजे देवी, असा त्याचा अर्थ आहे. तिचे वजन उचलण्याचे प्रशिक्षण पतियाळा येथे झाले. वजन उचलण्याची स्पर्धा हे क्षेत्र स्त्रियांचे नाही, अशी लोकांची समजूत आहे; परंतु मल्लेश्वरी हिच्या मते, आपण किती उत्साहाने काम करतो आणि आपल्या कामावर किती लक्ष केंद्रित करतो, हे याबाबतीत महत्त्वाचे ठरते. तिच्या मते, वजन उचलण्याचा खेळ ही सर्व खेळांची आई आहे. तिने प्रशिक्षण कालावधीत हिंदी भाषा शिकून घेतली. १९९० पासून प्रत्येक वर्षी आंतरराष्ट्रीय स्तरावर तिने वजन उचलण्याच्या स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले.

१९९४ या वर्षी तुर्कस्तान येथे आयोजित विश्व चॅम्पियन स्पर्धेत तिने दोन सुवर्ण व एक कांस्यपदक जिंकले. १९९५ या वर्षी चीनमध्ये तिला तीन सुवर्णपदके मिळाली, तर १९९६ या वर्षी जपान येथे झालेल्या स्पर्धेत तिला एक सुवर्णपदक प्राप्त झाले. १९९० या वर्षी ५२ ते ६९ किलोग्रॅम वजन उचलण्याच्या स्पर्धेच्या वेळी तिचे वय हे अवघे १५ वर्षांचे होते, हे खरोखरच कौतुकास्पद आहे. त्यानंतर तिने ११३.०० किलोग्रॅम वजन उचलून सुवर्णपदक मिळवले आणि वेटलिफ्टिंगच्या क्षेत्रात एक अव्वल दर्जाचे स्थान प्राप्त केले. वजन उचलण्याच्या स्पर्धेत कर्णम मल्लेश्वरी हिने आपले नाव अजरामर केले आहे.

- **लुकेश बडवाईक**

वर्ग ११ वी (कॉमर्स)



Scanned with OKEN Scanner



## कधीच हार न मानणारी

# पी. व्ही. सिंधू

पुसर्ला वेंकट सिंधूचा जन्म ५ जुलै, १९९५ ला झाला. तिच्या वडिलांचे नाव पी. व्ही. रमन आणि आईचे नाव विजया आहे. तिचे आई-वडील आपल्या देशाचे पूर्व व्हॉलिबॉल खेळाडू होते. तिला एक बहीण आहे. तिचे नाव पी. व्ही. दिव्या आहे. वर्ष २००० मध्ये तिचे वडील पी. व्ही. रमन यांना खेळासाठी 'अर्जुन अवॉर्ड'ही मिळाला होता. तिच्या घरी खेळाचेच वातावरण होते; परंतु तिला आपल्या आई-वडिलांच्या व्हॉलिबॉल या खेळाप्रति आकर्षण नव्हते. तिने खेळामध्ये बॅडमिंटन या खेळाला निवडले कारण पुलेला गोपीचंदच्या यशाने ती प्रभावित होती. पुलेला गोपीचंद हे ऑल इंग्लंड ओपन बॅडमिंटन चॅम्पियन (वर्ष २००१) होते.

सिंधूने वयाच्या आठव्या वर्षापासून बॅडमिंटन खेळणे सुरू केले. सिकंदराबाद येथील इंडियन रेल्वे इन्स्टिट्यूट ऑफ सिग्नल इंजिनीअरिंग अँड टेलिकम्युनिकेशनमधील मेहबूब अली यांच्याकडून बॅडमिंटनचे प्राथमिक धडे घेतले. नंतर पुलेला गोपीचंद यांच्या बॅडमिंटन अकादमीमध्ये प्रवेश घेतला. सिंधू यांचे प्रशिक्षक पुलेला गोपीचंद यांच्या म्हणण्यानुसार, सिंधूच्या व्यक्तिमत्त्वामध्ये सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे पराजय न स्वीकारणे आणि सातत्याने प्रयत्न करणे, ही होय.

'द हिंदू'च्या मतानुसार, कोचिंग कॅम्प तिच्या घरापासून ५६ किलोमीटर दूर असूनही ती रोज वेळेवर यायची, यावरून तिचे या खेळाप्रति आकर्षण, समर्पण व आवड लक्षात येते. तिने अनेक स्पर्धा जिंकल्या.

- **प्रिया निकोसे**
वर्ग ११वी (वाणिज्य)

## जीवनपुष्प

फुले शिकवतात
येता-जाता रडायचं नसतं
काट्यातसुद्धा हसायचं असतं;
अंधाराला घाबरायचं नसतं,
काळोखातही फुलायचं असतं;
रूसून-फुगून रहायचं नसतं,
हसून-नाचून जगायचं असतं;
सावळ्या रंगाने हिरमुसायचं नसतं,
गुणांच्या गंधाने जिंकायचं असतं;
स्वतःचा बडेजावपणा सांगायचा नसतो,
सद्गुणांचा सुगंध दूरवर पसरतो.
संकटाच्या चिखलात बुडायचं नसतं;
संकटांना बुडवून फुलायचं असतं;
फुले शिकवतात आयुष्यात,
फुलायचं असतं, फुलायचं असतं...!

- **अंकिता अलोणे,** बी. ए. भाग-१





## भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती

# प्रतिभाताई पाटील

आज भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून सर्व भारतीयांना प्रतिभाताई पाटील यांचे नाव सुपरिचित झाले आहे. आज परदेशात एवढे मानाचे पद कदाचितच कुणा स्त्रीला मिळाले असेल! प्रतिभाताईंच्या यशाकडे पूर्ण जग हे आदर्श म्हणून बघत आहे.

राजकीय क्षेत्रात जवळजवळ ४५ वर्षे त्यांची कारकीर्द आहे. १९ डिसेंबर, १९३४ रोजी प्रतिभाताईंचा जन्म जळगावच्या नंदगावजवळ झाला. ज्या काळात महिला घरचा उंबरठा ओलांडत नसत, पडद्यात राहत; अशा काळात त्यांचा जन्म झाला. बालपण संपत आल्यावर त्यांना असे दिसून आले की, महिलांना मोकळे वातावरण मिळत नाही, त्यांना विकासाच्या संधी उपलब्ध होत नाहीत. या महिलांसाठी आपण काहीतरी केले पाहिजे, हे त्यांनी तरुण वयातच ठरवले. विद्यार्थीदशेतच राजकीय क्षेत्रात आपण सक्रिय झालो पाहिजे, असे त्यांनी ठरवले. १९६२ या वर्षी म्हणजे वयाच्या २७ व्या वर्षी एदलाबाद येथून त्यांनी विधानसभेची निवडणूक काँग्रेस पक्षातर्फे लढवली आणि त्या निवडणुकीत जिंकल्यासुद्धा!

७ जुलै, १९६५ रोजी त्यांचा विवाह देवीसिंह शेखावत यांच्याशी झाला. त्यावेळी शेखावत अमरावतीचे महापौर होते. प्रतिभाताईंना दोन मुले (ज्योती व राजेंद्र) आहेत. प्राथमिक ते पदवीपर्यंतचे शिक्षण घेत असताना प्रतिभाताईंचे अनेक लोकांशी स्नेहसंबंध निर्माण झाले. शालेय जीवनातही त्या कोणतेही काम हिरिरीने करीत. त्यांनी काही दिवस वकिलीही केली. पुढे राजकारणात प्रवेश केला. बालपणापासूनच आपण काहीतरी वेगळे बनावे, अशी त्यांची इच्छा होती.

राजकारणात त्या खूपच सक्रिय होत्या. महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष बळकट करण्यासाठी त्यांनी फार मोठे कार्य केले. आणिबाणीनंतर जेव्हा इंदिराजींना अटक झाली, तेव्हा त्यांना साथ देणाऱ्या नेत्यांमध्ये प्रतिभाताई प्रामुख्याने होत्या. प्रतिभाताईंनी इंदिराजींबरोबर तुरुंगात जाणे स्वीकारले. गांधी कुटुंबाशी त्यांचे सलोख्याचे संबंध होते.

मुंबईच्या एम. जे. कॉलेजमधून एम.ए. आणि गव्हर्न्मेंट लॉ कॉलेजमधून त्यांनी कायद्याचे शिक्षण घेतले. राजकीय जीवनात त्यांना पुढे येण्याची प्रेरणा देण्यात मधुकरराव चौधरी, वसंतदादा पाटील यांचा फार मोठा वाटा आहे. १९६७ ते १९७२ पर्यंत महाराष्ट्र मंत्रिमंडळात त्यांनी राज्यमंत्र्यांच्या भूमिकेत आरोग्य, पर्यटन, निवास आणि संसदीय कार्ये यांसारख्या महत्त्वपूर्ण विभागांचे कॅबिनेट मंत्री म्हणून काम



Scanned with OKEN Scanner

पाहिले. १९७२ ते १९८० पर्यंत त्या विरोधी पक्षनेत्या म्हणून राहिल्या. १९८२ ते १९८५ पर्यंत त्यांनी ग्रामीण विकास, निवास, समाजकल्याण आणि नागरिक कल्याण इ. मंत्रालयातील खात्यांचे काम व्यवस्थित सांभाळले. १९६२ ते १९८५ या काळात त्या पाच वेळा महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्या होत्या. महाराष्ट्राच्या राजकारणानंतर त्या देशाच्या राजकारणात क्रियाशील झाल्या. १९८६ ते १९८८ पर्यंत त्या राज्यसभेच्या उपसभापती होत्या. १९९० या वर्षी त्यांचा कालावधी संपला. राजीव गांधींच्या निधनानंतर दहाव्या लोकसभा निवडणुकीत (१९९१) त्या अमरावतीतून लोकसभेच्या उमेदवार बनल्या. लोकसभेत त्यावेळी त्यांनी अनेक मुद्दे मांडले. लोकसभेचा कालावधी संपल्यानंतर त्यांनी राजकारणातून निवृत्त होऊन स्वतःला समाजकार्यात झोकून दिले. नंतर त्या राजस्थानच्या राज्यपाल होत्या.

१९ जुलै, २००७ रोजी राष्ट्रपती पदासाठी निवडणूक झाली. प्रतिभाताई पाटील यांनी आपले प्रतिस्पर्धी भैरोसिंह यांचा तीन लाख मतांनी पराभव करून राष्ट्रपती पदाची निवडणूक जिंकली. त्या देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती झाल्या, तर जगातील ४१ व्या महिला राष्ट्राध्यक्ष आहेत. राष्ट्रपतीपदाची सूत्रे त्यांनी हातात घेतल्यानंतर सेनेने त्यांना २१ तोफांची सलामी दिली. महिलांच्या सबलीकरणावर भर देणे, आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे आपल्या गरजा विकसित व्हाव्या, यासाठी प्रयत्न करणे हे त्यांचे प्रमुख कार्य असेल, असे त्या राष्ट्रपती पदाचा भार स्वीकारल्यानंतर म्हणाल्या.

१९६२ या वर्षी विधानसभा, २००४ या वर्षी राज्यपाल आणि २००७ मध्ये त्या राष्ट्रपती पदापर्यंत पोहोचल्या. त्यांचा हा जीवनप्रवास निश्चितच प्रेरणादायी असाच आहे. त्यांची देशाबद्दलची निष्ठा, संवेदनशीलता आणि सतत कार्यरत राहण्याची वृत्ती या यशामागे आहे.

**- वैष्णवी तुळणकर**
वर्ग ११ वा (वाणिज्य)

## लावू चला वृक्ष



निसर्गाची रीत
सदा करी प्रीत
मानवाशी!
मुक्यांची कमजोरी
मानवाची मुजोरी
सर्व काळ!
वाढली आबादी
झाली हो बरबादी
माणसाची!
वाढले प्रदूषण
बिघडले संतुलन
निसर्गाचे!
चिमणीपाखरं
झाली हो बेघर
झाडाविना!
आम्ही तोडली झाडं
मग इंद्राला साकडे
पाण्यासाठी!
होऊनिया दक्ष
लावू चला वृक्ष
सावलीचे!

**- करिश्मा डिगंबरे**
बी.ए. भाग-३

## शोधू कुठे....

शोधू कुठे तुला मी?
आई कुणा म्हणू मी?
ही आसवे कशी गं
मग सांग आवरू मी?
शोधू कुठे...
का लावला लळा तू
या लाडक्या पिलांना?
सोडून का अशी गं
गेलीस लेकरांना?
पंखांविना कशी गं
मग सांग आवरू मी?
शोधू कुठे....
भेटेल स्वर्ग मजला
आई असेल जेथे
आई तुझ्या पिलांना
जग पोरकेच वाटे
माया आता कुणाची
दुःखात पांघरू मी?
शोधू कुठे....

**- आशीष पाटील**
बी.ए. भाग-३







### अवकाशातील अजरामर तारा

# कल्पना चावला

साहस आणि इच्छाशक्तीच्या जोरावर कल्पना चावला यांनी अंतराळ संशोधन आणि प्रवास यामध्ये आपले नाव अजरामर करून ठेवले आहे. हरयाणा या राज्यातील एका छोट्या शहरामध्ये १९६१ या वर्षी चावला कुटुंब भारतात आले. कल्पना चावला यांचे कुटुंबीय अत्यंत धार्मिक प्रवृत्तीचे होते. बालपणी कल्पनाला सर्वजण प्रेमाने 'मोंटू' म्हणत असत. त्यांच्या घरी नेहमी शाकाहारी, सात्त्विक भोजन होत असे. याचा फायदा कल्पनाला अंतराळ प्रवासात झाला.

कष्ट केल्याने कुठल्याही प्रकारचे नुकसान होत नाही, असे चावला कुटुंबीयाचे सूत्र होते. जेव्हा टायर बनवण्याच्या स्वदेशी यंत्राचा शोध कल्पनाचे वडील बनारसीलाल चावला यांनी लावला, तेव्हा त्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. याचा प्रभाव कल्पनावर पडला. १७ फेब्रुवारी, २००३ मध्ये कल्पना कोलंबिया यानातून प्रवास करणार होती, तत्पूर्वी तिने आपल्या भाषणात असे म्हटले होते की, परिस्थिती कशीही असो; सतत परिश्रम करीत राहिल्यास आपली स्वप्ने साकार होण्यात मदत मिळते.

कल्पनाचे बालपण छोट्याशा खेड्यात गेले. उन्हाळ्याच्या दिवसांत वीजपुरवठा खंडित होत असे तेव्हा सर्वांना अंगणात झोपावे लागायचे. पडल्या पडल्या ती आकाशातले चमचमणारे तारे पाहायची आणि त्यातून ती आपल्या भावी जीवनातील स्वप्ने रंगवत असे. आपल्यालाही अंतराळात प्रवास करता येईल का, असा प्रश्न तिच्या मनात निर्माण होत असे. अंतराळयान कसे उडते, खाली कसे येते, याबद्दलची तिच्या मनात नेहमी कुतूहल असे. अकराव्या वर्गात गेल्यावर तिने अंतराळ विज्ञान हा विषय अभ्यासासाठी निवडला. तिच्या आईने तिला याबाबत प्रोत्साहन दिले. १९७६ या वर्षी तिचे शालेय शिक्षण पूर्ण झाले. 'नासा' या संस्थेत तिची उन्हाळी शिबिरासाठी निवड करण्यात आली. नंतर तिने इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये अंतराळ अभियांत्रिकी विषयात शिक्षण पूर्ण केले. तिला स्पेस इंजिनीअर व्हायचे होते. १९७९ या वर्षी कल्पनाने एका वर्षाचे 'एअरोनॉटिक्स' पदवीचे शिक्षण पूर्ण केले. नंतर कल्पनाला अमेरिकन विद्यापीठात पाठवले गेले. अमेरिकेत तिची जीन पियरे हॅरिसन यांच्याशी भेट झाली. कल्पनामधील साहसी वृत्ती व तीक्ष्ण बुद्धिमत्ता त्यांनी हेरली. १९८३ या वर्षी तिचा विवाह झाला. मास्टर डिग्री मिळवल्यानंतर व कोलोरॅडो शहरातील वोल्डर येथील प्रसिद्ध विद्यापीठात तिने मेकॅनिकल इंजिनीअरिंगमध्ये डॉक्टरेट पदवी संपादन केली. अंतराळ इंजिनीअरिंग हा विषय तिने निवडला. ६ मार्च, १९९५ या वर्षी कल्पनाने नासाचे एक वर्षाचे प्रशिक्षण घेतले. १९९६ पर्यंत तिने एवढे ज्ञान संपादन



Scanned with OKEN Scanner

केले की, तिच्यावर रोबो संचालक पदाची जबाबदारी सोपवण्यात आली. तिने अंतराळ प्रवास सुरू केला. नंतर १६ दिवसांनी हे यान पूर्ण प्रवास करून केनेडी अंतराळ संशोधन केंद्रावर उतरले.

नासाने दुसऱ्या अंतराळ प्रवासाची तारीख १६ जानेवारी, २००३ निश्चित केली. कोलंबिया हे नाव या यानाचे होते. या मोहिमेत कल्पनावर महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. आय.टी.एस. १०७ चा चालक समूह फार ग्रहणशील होता. पण, उपग्रह आणि कम्प्युटर प्रणालीत काहीतरी गडबड झाली. त्यामुळे कल्पनाला एका फार मोठ्या संकटाशी सामना करावा लागला. परिणामी, कल्पनाचा हा अंतराळ प्रवास यशस्वी झाला नाही. पृथ्वीच्या कक्षेत अंतराळ यान फिरू लागले; अमेरिका व भारतातील सर्व लोक तिचे अंतराळ यान सुखरूप परत यावे म्हणून प्रार्थना करू लागले. परंतु २००३ या वर्षीच्या फेब्रुवारीलाच यानाचे तुकडे झाले. कल्पनाला या प्रवासात एका अर्थाने वीरमरण आले.

कल्पनाची [illegible] तिच्या कुटुंबीयांनी 'मोंटूस फाउंडेशन'ची स्थापना केली. आर्थिक परिस्थितीच्या कारणांमुळे जर युवक-युवतींना उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागत असेल तर विद्यापीठाच्या पातळीवर त्यांना उच्च शिक्षणाच्या प्राप्तीसाठी मदत करणे, हा या फाउंडेशनचा उद्देश आहे.

कल्पना चावलाच्या जीवनावरून असे लक्षात येते की, ध्येयनिष्ठ आणि कर्तव्यनिष्ठ व्यक्तींना काहीच अशक्य नाही. कल्पनाने सर्व जगामध्ये भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. माजी राष्ट्रपती दिवंगत अब्दुल कलाम यांनी कल्पनाबद्दल गौरवोद्गार काढले आहेत. 'ती ताऱ्यांच्याही पुढे गेली', असे मत तत्कालीन अमेरिकन राष्ट्रपती जॉर्ज बुश यांनी व्यक्त केले होते.

- भुमेश्वरी अंबागडे
वर्ग ११ वा (वाणिज्य)

## मुलगी जगली पाहिजे!

जन्म द्यायला आईच पाहिजे,
राखी बांधायला बहीणच पाहिजे,
गोष्ट सांगायला आजी पाहिजे,
हट्ट पुरवायला मावशी पाहिजे,
पुरणपोळी भरवायला मामी पाहिजे,
जीवनाच्या सोबतीला मैत्रीण पाहिजे,
आयुष्याच्या साथीला बायको पाहिजे,
पण हे सर्व करायला आधी एक
मुलगी जगली पाहिजे...!



- भारत भुरे
बी.ए. भाग-२

## रम्य पहाट

जीवन एक आहे रम्य पहाट..
संकटांनी गजबजलेली ती वादळवाट..
सोनेरी क्षणांची एक आहे आठवण
सुख-दुःखाची ती एक साठवण..
प्रेमाच्या पाझराची वाहती एक सरिता..
नात्याच्या अतुट शब्दांनी
गुंफलेली ती कविता..
जाणिवेच्या पलीकडचं
जगावेगळं गाव..
यालाच तर आहे
'आयुष्य' हे नाव...!

- अश्विनी निमपुरे
बी. कॉम. भाग-३





## स्वातंत्र्योत्तर काळातील प्रभावी महिला

# श्रीमती इंदिरा गांधी

भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळातील एक अत्यंत प्रभावी व्यक्ती म्हणून श्रीमती इंदिरा गांधी यांचा उल्लेख करावा लागेल. आपल्या कार्याने त्यांनी भारताच्या इतिहासात आपले नाव अजरामर केले. आपल्या पित्याप्रमाणे त्याही प्रसिद्ध होत्या. १९ नोव्हेंबर, १९१७ हा इंदिरा गांधींचा जन्मदिवस. अत्यंत सुंदर, कुरळ्या केसांच्या त्या बालिकेचं नाव प्रियदर्शनी होतं. प्रियदर्शनीचे वडील म्हणजे जवाहरलाल नेहरू, आजोबा मोतीलाल नेहरू स्वातंत्र्य संग्रामातील अग्रगण्य व्यक्ती!

इंदिरा म्हणजे नेहरू घराण्यातलं एकमेव अपत्य. सुंदरशा या एकुलत्या एक अपत्याचं खूप कोडकौतुक झालं. एक सुख मात्र प्रियदर्शनीस बालपणी नव्हतं. ते म्हणजे तिला आई-वडिलांचा सहवास फारसा मिळत नव्हता. त्यांचे वडील जवाहरलाल नेहरू नेहमी तुरुंगात असायचे. कधी तुरुंगाबाहेर असले तर राजकीय कामानिमित्त देश-विदेशात दौऱ्यावर असायचे. इंदिराजींची आई म्हणजे कमलादेवी. त्या नेहमी आजारी असत. इंदिराजींच्या जन्मापासूनच त्यांच्या आईची प्रकृती तोळामासा राहू लागली होती. डॉक्टरांचे उपाय अहोरात्र सुरू होते. मात्र, औषध उपाययोजनेमुळे म्हणावा तेवढा फायदा कमलादेवींना होत नव्हता.

अनेकानेक थोर व्यक्तींचा परिचय इंदिराशी आपोआप होत असे. त्यांचे विचार ऐकण्याचे भाग्य इंदिराजींना बालपणी मिळालं. इंदिराजींनी स्वातंत्र्य चळवळीत कार्य केलं. आपल्या वयाच्या मुलांची वानर सेना उभी केली. ही सेना निरनिराळी कामं करायची. दरम्यान, विविध उपाययोजना होऊनही कमलादेवींच्या प्रकृतीत सुधारणा होत नव्हती. दिवसेंदिवस ती विकोपाला जाऊ लागली. त्यांना औषधोपचारासाठी युरोपला नेलं. पण, त्या बऱ्या झाल्या नाहीत. २८ फेब्रुवारी, १९३६ रोजी त्यांचं विदेशातच देहावसान झालं.

जवाहरलालजींनी पुढलं आयुष्य एकाकीपणे घालवलं. इंदिराजींचं मातृछत्र हरपलं होतं. १९४२ च्या मार्चमध्ये इंदिरांचा फिरोझ गांधी या तडफदार, हुशार तरुणाशी विवाह झाला. नेहरू घराण्याचा आणि फिरोझचा फार वर्षापूर्वीचा परिचय होता. कमला नेहरू युरोपमध्ये असताना फिरोझने त्यांची सेवा केली होती, काळजी वाहिली होती. महात्मा गांधींनी त्यांच्या विवाहाला पाठिंबा देऊन आशीर्वाद दिले. त्यांनी लोकांच्या टीकेची दखल घेतली नाही. २६ मार्चला इंदिरा-फिरोझचा विवाह आनंदभवनात



Scanned with OKEN Scanner

भारतात संपन्न झाला.

१९४७ च्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंडित जवाहरलाल नेहरू भारताचे पहिले पंतप्रधान झाले. इंदिराजी, राजीव-संजयसह दिल्ली येथे त्यांच्याकडे राहण्यासाठी आल्या. जवाहरलालजींच्या हयातीत त्या वर्षभर काँग्रेसच्या अध्यक्षपदी होत्या. मे १९६४ मध्ये जवाहरलालजींचे देहावसान झाले. पंतप्रधानपद लालबहादूर शास्त्रींकडे देण्यात आले. १९६६ च्या जानेवारी महिन्यात लालबहादूर शास्त्रींचे ताश्कंद येथे देहावसान झाले. पंतप्रधानपद रिकामे झाले. काँग्रेस पक्षाने इंदिराजींना पंतप्रधान म्हणून निवडलं. त्यावेळी त्यांचे प्रतिस्पर्धी होते मोरारजी देसाई. त्यांनाही अनेक काँग्रेस नेत्यांचा पाठिंबा होता; पण बहुमताने इंदिराजींच्या बाजूने कौल दिला आणि त्यांची निवड झाली.

**इंदिराजी भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान**

इंदिराजींना काँग्रेसमधील दुफळीची चांगलीच जाणीव होती. त्यादरम्यान राष्ट्रपतिपदासाठी निवडणूक झाली. ती फार चुरशीची ठरली. पक्ष श्रेष्ठ की व्यक्ती श्रेष्ठ, हा प्रश्न समोर आला. संजीव रेड्डी हे काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार होते, तर विरोधी पक्ष व इंदिराजींचा पाठिंबा उपराष्ट्रपतिपदावर पाच वर्षे असलेले स्वतंत्र उमेदवार वराहगिरी व्यंकटगिरी यांना होता.

पंतप्रधानपदी इंदिराजींची निवड झाली होती. देशात अनेक आर्थिक व राजकीय पेचप्रसंग होते. इंदिराजींना त्या चिंता होत्याच. भारताचे पंतप्रधानपद एका महिलेकडे आहे, शिवाय त्यांच्या पक्षातच दुफळी असल्याचे लक्षात येताच पाकिस्तानने भारतावर युद्ध लादले. इंदिराजींनी यातही मार्ग काढून देशाला प्रगतीच्या दिशेने अग्रेसर केले.

१९८१ या वर्षी झालेल्या निवडणुकीत इंदिराजी व त्यांचा [illegible] आला. केंद्रात सत्तारूढ झाला. इंदिराजी पुन्हा पंतप्रधान झाल्या. सुवर्ण मंदिरात घुसलेल्या दहशतवाद्यांना [illegible] करण्याचा आदेश त्यांनी लष्कराला दिला. ३१ ऑक्टोबर, १९८४ रोजी सकाळी नऊदरम्यान सतवंतसिंग आणि बेअंतसिंग या इंदिराजींच्या रक्षकांनीच त्यांच्यावर गोळ्यांचा वर्षाव केला. रक्षकच भक्षक बनले. तीसहून अधिक गोळ्या त्यांच्यावर झाडण्यात आल्या. त्यांचा देह धारातीर्थी पडला. त्यांच्या देहाची अक्षरशः चाळणी झाली होती. त्यावेळी इंदिराजी नुकताच आपातदौरा करून परतल्या होत्या. तेथे केलेल्या भाषणात त्या म्हणाल्या होत्या, माझ्या शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी देशकार्य करीत राहीन. त्यांना कुठे माहीत होते की, हे त्यांचे शेवटचे भाषण ठरणार आहे! एक धाडसी, खंबीर व्यक्ती स्वतःच्या रक्षकांकडून मारली जावी, केवढे हे दुर्दैव! साऱ्या जगाला भारताच्या तेजःपुंज अस्मितेचं दर्शन घडवून देणाऱ्या इंदिराजी अनंतात विलीन झाल्या. सारा भारत देश त्यांच्या मृत्यूने दुःखी झाला. देश विदेशातील महत्त्वाच्या व्यक्तींच्या, मान्यवरांच्या उपस्थितीत सरकारी इतमामात त्यांना अग्नी देण्यात आला. शक्तिस्थळ म्हणून त्यांची समाधी ओळखली जाते. भारताचं नाव जगात उंच करण्याचं कार्य इंदिराजींनी केलं. आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून त्या सर्व कार्य करत होत्या. भ्रष्टांना फासावर चढवू नये, त्यांची सन्मानपूर्वक सुटका करावी, असं आवाहन त्यांनी सर्वप्रथम भारतातर्फे केलं. इंदिराजींनी दाखवलेला मनाचा मोठेपणा फार क्वचित कुणी दाखवतं! इंदिराजी भारताच्या इतिहासातील एकमेव महिला पंतप्रधान ठरल्या.

**- शीतल दबडे**
बी. कॉम. भाग-१





## महिलांसाठी प्रेरणादायी ज्योत

# सरोजिनी नायडू

**"प्रेरणादायी ज्योत ही सदा तेजत राहो**
**प्रत्येक महिला स्वावलंबी अन् साक्षर होत राहो."**

सरोजिनी नायडू यांचा जन्म १३ फेब्रुवारी, १८७९ या दिवशी हैदराबाद येथे एका सधन व सुसंस्कृत बंगाली कुटुंबात झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव सरोजिनी चट्टोपाध्याय (चॅटर्जी) होते. त्यांच्या वडिलांचे नाव अघोरनाथ, तर आईचे नाव वरदासुंदरीदेवी होते. त्यांचे वडील निझाम महाविद्यालयाचे प्राचार्य होते आणि आई बंगालीमध्ये कविता करत असे. सरोजिनी लहानपणापासून कविता करत असत. त्यांचे प्राथमिक शिक्षण घरीच झाले. १८९२ या वर्षी म्हणजे वयाच्या बाराव्या वर्षी त्या मद्रास इलाख्यात मॅट्रिकच्या परीक्षेत पहिल्या आल्या. १८९५ या वर्षी निझाम महाविद्यालयाची शिष्यवृत्ती घेऊन सरोजिनी उच्च शिक्षणासाठी इंग्लंड येथे गेल्या. लंडन आणि केंब्रिज येथे शिक्षण घेतले. आजारपणामुळे त्यांना शिक्षण अर्धवट सोडून भारतात परत यावे लागले.

इंग्लंड येथील वास्तव्यात त्यांचा परिचय एडमंड गॉस या इंग्लिश साहित्य समीक्षकाशी झाला. सरोजिनी यांनी आपल्या कविता गॉस यांना दाखवल्या.

१९०५ यावर्षी प्रसिद्ध झालेल्या 'द गोल्डन थ्रेशोल्ड' या त्यांच्या पहिल्या कवितासंग्रहाची प्रस्तावना गॉस यांनी लिहिली होती. हा कवितासंग्रह त्यावेळच्या साहित्यक्षेत्रात खूप गाजला. त्याबद्दल रवींद्रनाथ टागोरांनीही सरोजिनींचे कौतुक केले.

१९१२ यावर्षी 'द बर्ड ऑफ टाइम' आणि १९१७ यावर्षी 'द ब्रोकन विंग' ही त्यांची दोन काव्यसंग्रहे प्रसिद्ध झाली. हिन्दी महिलेने सुरेख इंग्रजीत लिहिलेल्या या कविता स्वरमाधुर्य, राष्ट्रीय दृष्टिकोन, प्रेमाचा पुरस्कार आणि क्रांतिकारक राष्ट्रवादी विचार अशा वैशिष्ट्यांमुळे पाश्चात्य आणि पौर्वात्य देशांतही लोकप्रिय झाल्या.

१८९८ यावर्षी सरोजिनींचा विवाह डॉ. गोविंद राजुलू नायडू या निझाम संस्थानातील डॉक्टरांशी झाला. हा विवाह बंगाल आणि मद्रास असा आंतरप्रांतीय आणि आंतरजातीयही होता. त्यामुळे त्यावेळी तो खूप गाजला आणि तेथूनच सरोजिनी यांच्या सामाजिक कार्याची सुरुवातही झाली.

१९०३ ते १९१७ यादरम्यान त्यांचा परिचय एम. ए. जिना, गो. कृ. गोखले, रवींद्रनाथ टागोर, लोकमान्य टिळक, ॲनी बेझंट, सी. पी. रामस्वामी अय्यर, जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी अशा ज्येष्ठ आणि श्रेष्ठ व्यक्तींशी झाला. त्यांच्या आचारविचारांनी सरोजिनी प्रभावित झाल्या. होमरूल लीगसाठी त्यांनी



Scanned with OKEN Scanner

डॉ. सी. वेंकट आणि सी. पी. रामस्वामी अय्यर यांच्याबरोबर भारतभर दौरा काढला. आपल्या भाषणांतून त्यांनी समर्पित स्वातंत्र्य आणि राष्ट्रवाद यांचा पुरस्कार केला.

त्यांच्या भाषणांमुळे गोखलेंसारखी श्रेष्ठ व्यक्तीही प्रभावित झाली. त्यांनी गोपाळकृष्ण गोखले यांना आपले गुरु व महात्मा गांधी यांना आपला नेता मानले होते. हैदराबाद येथे आलेल्या प्लेगच्या साथीत सरोजिनी यांनी खूप कष्ट करून जनतेला सर्वतोपरी मदत केली होती. त्याबद्दल त्यांना ब्रिटिश सरकारने कैसर-ए-हिंद हे सुवर्णपदक दिले होते. पण, जालियनवाला बाग येथील हत्याकांडाचा निषेध करून त्यांनी ते सुवर्णपदक सरकारला परत दिले.

हिंदु मुसलमान ऐक्य, स्त्रियांचे हक्क आणि स्वातंत्र्य यांसाठी काम करणे हेच सरोजिनी यांनी आपले जीवनकार्य मानले. कोलकाता येथे १९०७ साली झालेल्या बंगालच्या फाळणीविरोधी सभेत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

१९०८ सालच्या विधवा विवाह परिषदेत त्यांनी स्त्रियांच्या चळवळीचा पाया घातला. १९२१ मध्ये त्या प्रांतिक कौन्सिलच्या अध्यक्षा झाल्या. १९२५ साली कानपूर येथील अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षा म्हणून त्यांची निवड झाली. १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहात त्यांनी एका महत्त्वपूर्ण तुकडीचे नेतृत्व केले. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांना इतर नेत्यांप्रमाणेच कैद झाली. त्यांची रवानगी आगा खान पॅलेस येथे झाली. त्यावेळी त्यांनी आईप्रमाणे आपल्या सहकाऱ्यांची काळजी घेतली.

भारत-पाकिस्तान फाळणी आणि गांधीजींचा खुन या दोन गोष्टींमुळे त्या खचल्या. इच्छा नसतानाही त्यांना उत्तर प्रदेशचे राज्यपालपद देण्यात आले होते. पण, त्यानंतर थोड्या काळात म्हणजे २ मार्च, १९४९ यादिवशी त्यांचे निधन झाले.

"नसुनी अबला, आहे ती सबला,
जाणीव करून दिली महिलांना
म्हणून आज प्रत्येक क्षेत्रात
त्या दिसतात प्रगती करताना.'

- प्रतीक रामटेके
बी.ए. भाग-२

## प्रतिकार

पितृप्रधान देशात
महिलांवर होतो अत्याचार
दुर्बल मानसिकतेच्या
महिला झाल्या शिकार!
आधुनिक युगात
बुद्धीचा झाला आविष्कार
पण माणसातला अजून
संपला नाही विकार!



इथे देवी, देवतांची
पूजा होते अपार
पण स्त्रीला देवी मानण्यास
अजून आमचा नकार!
हरवली माणसांची मती
रोज हत्या अन् बलात्कार
माणूस बनला सैतान
वाढू लागला अहंकार!
आहे स्त्री-पुरुष समानता
घ्या घटनेचा आधार
होऊन तुम्ही सबला
करा अन्यायाचा प्रतिकार!

- विशाल बागडे
बी.ए. भाग-१





जगातील आठवे आश्चर्य

# डॉ. हेलन केलर

संस्कृतमधील एका श्लोकामध्ये मूकं करोति वाचालम्! पंगु लंघयते गिरिम्! असे वचन आहे. प्रत्यक्षात पंगू व्यक्ती धड चालणे शक्य नसताना प्रयत्नांच्या मदतीने ती पर्वतही ओलांडू शकते, असा त्याचा भावार्थ आहे. हेलन केलर यांचा जन्म २७ जून, १८८० रोजी दक्षिण अमेरिकेत उत्तर अल्बामाच्या टस्कम्बिया या छोट्याशा गावात झाला. हेलन यांचे पणजोबा कास्पर केलर हे मूळचे स्वित्झर्लंडमधील राहणारे. त्यांनी स्वत: अमेरिकेत जाऊन मेरिलँड येथे वसाहत केली.

बालपणातील हेलनचे १९ महिने अत्यंत सुखाचे गेले. सर्वसामान्य मुलीप्रमाणे ती डोळस होती; परंतु निसर्गाला तिचे सुख पाहावले नाही. एकदा ती तापाने आजारी पडली. ताप आला तसा गेला; परंतु त्या आजारामुळे हेलन बहिरी, मुकी व आंधळी झाली. अशाप्रकारचे जीवन जगावे लागल्यामुळे हेलन अनेक सुखांना पारखी झाली. परिणामी, सात-आठ वर्षांची होईपर्यंत ती अतिशय हट्टी व हेकेखोर झाली होती. तिच्या जीवनात अंधारच पसरला होता.

अंधकारातून प्रकाशाकडे जाता येत नाही, याचे आईवडिलांना अतिशय वाईट वाटे. ते हेलनला कोणी शिक्षक शिकवू शकेल का, या विचारात होते. त्यांच्या कित्येक नातलगांना व स्नेह्यांना आंधळ्या, बहिऱ्या हेलनला शिकता येईल, यावर अजिबात विश्वास नव्हता. हेलन सहा वर्षांची असताना बाल्टीमोर येथील नेत्रविशारद यांच्याकडे उपचार करण्यासाठी वडील घेऊन गेले. ते डोळ्यांवर फारसे उपचार करू शकले नाहीत. परंतु त्यांनी अलेक्झांडर ग्रॅहम बेल यांना भेटण्याचा सल्ला दिला. ग्रॅहम बेल यांनी हेलनला आपल्या मांडीवर बसवले, घड्याळ दाखवले. त्यांच्या खुणा हेलनला चांगल्याच समजत होत्या. बेल यांनी हेलन चांगल्या प्रकारे शिकू शकेल, त्यासाठी तज्ज्ञ शिक्षक मिळण्यासाठी बोस्टन येथील परकिन्स अंधशाळेचे प्रमुख यांच्याकडे प्रयत्न करण्याचा सल्ला दिला.

हेलन ज्यादिवशी 'पाणी' शब्द शिकली, त्या दिवसापासून तिच्या जीवनातील अंधकारामधून प्रकाशाचा किरण निर्माण झाला. सुलिव्हॅन नामक शिक्षिकेच्या मदतीने आंधळेपणा, बहिरेपणा, मुकेपणा या बेड्या नाहीशा होऊन हेलनच्या मनात आत्मविश्वास व जीवनात प्रकाश निर्माण झाला. हेलन जिद्दीने खुणेची भाषा शिकू लागली. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इतिहास, भूगोल, गणित हे विषय घेऊन पंगुपणावर मात करून हेलनने बी.ए. (ऑनर्स) पदवी मिळवली. पुढील आयुष्यात अंध व अपंगांसाठी भरीव काम केले. जगामध्ये इतिहास घडवला.



Scanned with OKEN Scanner

हेलन अंध, बहिरी, मुकी असल्यामुळे विचार समजून घेणे, आपले विचार, इच्छा व्यक्त करण्यापुरते लेखन व वाचन शिकण्यामध्ये तिला समाधान नव्हते. ती जिद्दीने बोलायलाच शिकल्यावर तिने पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले.

लहानपणापासुन निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याची त्यांना आवड निर्माण झाली होती. १९०० या वर्षीच्या उन्हाळ्यात न्यू इंग्लंडमधील एका सुंदर खेड्यात एका रम्य पण अज्ञातस्थळी हेलन राहिल्या. तेथील शांत व निसर्गरम्य निसर्गाच्या, लहान मुलांच्या सान्निध्यात त्या रमल्या.

हेलन यांनी आपल्या शिक्षिकेच्या साहाय्याने जगात चमत्कार घडवून दाखवला. त्या वयाच्या ११ व्या वर्षी अक्षरशः बोलू लागल्या. हेलन यांनी जे अगाध ज्ञान मिळवले होते, ते त्यांच्या तोंडून ऐकून मोठमोठे विद्वान थक्क होत असे.

हेलन यांनी स्वप्रयत्नाने बी.ए. (ऑ.) ही पदवी मिळवली. एवढे ज्ञान मिळाल्यावर भरपूर अर्थार्जन करून त्यांना सुखात राहता आले असते; परंतु आपले पुढील आयुष्य त्यांनी अंध, अपंग अशा आपल्यासारख्या अभागी बंधू-भगिनींसाठी वाहून घेतले.

सन १९३१ या वर्षी अमेरिकन फाउंडेशन फॉर ब्लाइंड या संस्थेने जास्तीत जास्त निधी उभारण्याच्या कामगिरीबद्दल त्यांना पाच हजार डॉलर्सचे बक्षीस दिले. ते त्यांनी परत त्या संस्थेला देणगी म्हणून दिले. १९३८ या वर्षी अमेरिकेच्या राष्ट्रीय शैक्षणिक संघटनेने त्यांना सोन्याची किल्ली भेट म्हणून दिली.

स्टोरी ऑफ माय लाइफ (१९०३), दि साँग ऑफ द स्टोन वॉल (१९१०), मिड स्ट्रीट ऑफ माय लेटर लाइफ (१९३०), लेट अस हॅव फेथ (१९४०) ही पुस्तके लिहिली.

अशा या थोर विदूषीचा १ जून, १९६८ रोजी कनेक्टिकेट राज्यात ईस्टन येथे निधन झाले. डॉ. हेलन केलर जग सोडून गेल्या तरी पुस्तके, केलेले कार्य या [illegible] अजरामर राहील. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी जे उदात्त व महान कार्य केले त्यामुळे डॉ. हेलेन केलर यांना जगातील आठवे आश्चर्य म्हणून ओळखले जाते. इतकेच नव्हे, तर त्यांच्या जीवनावर आधारित 'हेलन केलर इन हर स्टोरी' व 'दि मिरॅकल वर्कर' हे चित्रपट तयार झाले. अशाप्रकारे त्यांचे आयुष्य दुर्दैवी अपंग व्यक्तींना स्फूर्तिदायक ठरेलच; परंतु इतरांनाही प्रेरणादायक होईल, यात शंकाच नाही.

**- रोशन काटोले**
वर्ग ११ वी (आर्टस्)

## पतंग उडवू चला...

पतंग उडवू चला...
गड्यांनो, पतंग उडवू चला!
रंग ढगांवर मावळतीचा,
लाल-पिवळसर किती मजेचा,
झुळझुळ वारा नदीकाठचा,
बाजूस डोंगरमळा!
करू चला सुरुवात बरोबर,
सोडा सोडा रीळ भराभर,
पतंग चढवा रे वाऱ्यावर,
ढगांस भेटायला!
मऊ मऊ वाळूत पाय रोवुनं
देऊ झटका दोरा ओढुनी,
पतंग जाती वर वर चढुनी,
पंख नको त्याजला!
जशी पाखरे आभाळात,
पंख पसरूनी तरंगतात,
दिसतील तैसे पतंग रंगीत,
खेळ किती चांगला...!



**- शुभम विष्णुरकर**
बी.ए. भाग-२





### मतिमंद मुलांकडे समाजाचे लक्ष वेधणाऱ्या

# मारिया मॉँटेसरी

मारिया मॉँटेसरी या इटालियन शिक्षणतज्ज्ञ होत्या. शरीरविज्ञान आणि मॉँटेसरी शिक्षणपद्धतीच्या जनक म्हणूनही त्या प्रसिद्ध आहेत. क्याराव्हाले या इटलीतील गावी त्यांचा जन्म झाला. १८९६ या वर्षी त्यांनी रोम विद्यापीठातून वैद्यकीय पदवी घेतली. ही पदवी प्राप्त करणाऱ्या त्या पहिल्या महिला होत्या. वृत्तपत्रांनी तिला सूर्यकिरण (सन रेज) म्हणून गौरवले. वैद्यकीय पदवीनंतर रोममधील सर्व रुग्णालयांतील रिकाम्या जागेसाठी झालेल्या स्पर्धेत त्यांनी भाग घेतला व यश प्राप्त केले. १८९७ या वर्षी युरोप खंडात अशा मानाच्या जागी निवडलेली ही पहिली महिला होय.

तुरीन येथे आयोजित (१८९८) वैद्यकीय परिषदेत भाग घेऊन त्यांनी - मतिमंद मुलांकडे दुर्लक्ष करणारा समाज व डॉक्टर हेच खरे गुन्हेगार असल्याचा विचार मांडला. त्यांच्या या स्पष्ट व सडेतोड विचारांचा परिणाम युरोपभर झाला. इटलीमध्ये त्यांनी मतिमंद मुलांसाठी संस्था स्थापन केली. मानसिक वैफल्य ही वैद्यकशास्त्राची समस्या नसून, शैक्षणिक समस्या असल्याचे त्यांना वाटले. मतिमंदांच्या शिक्षणपद्धतीचा त्यांनी अभ्यास केला. १८९९ या वर्षी लंडन येथे आयोजित पहिल्या परिषदेस इटालियन महिला प्रतिनिधी म्हणून त्या हजर होत्या.

१९०७ या वर्षी मॉँटेसरीबाईंनी रोमच्या गलिच्छ वस्तीत पहिली मॉँटेसरी शाळा - बालक मंदिर सुरू केले. वैद्यकीय व्यवसायातील प्रतिष्ठा हा मोह टाळून त्यांनी शैक्षणिक कार्यास स्वतःला वाहून घेतले. मतिमंद मुलांच्या मनोविकासासाठी त्यांच्या ज्ञानेंद्रियांची व स्नायूंची संचलनशक्ती विकसित करणे आवश्यक आहे, असे मत प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ एडवर्ड सॅग्विन यांनी मांडले. त्यांच्या या संशोधनाने मारिया मॉँटेसरी प्रेरित झाल्या. त्यांनी मतिमंदांच्या शिक्षणासाठी खास साहित्य तयार केले. परिणामी, मतिमंद मुले प्रगती करू शकली, तर काही मुले सर्वसामान्यांबरोबर काम करू शकली. या अनपेक्षित यशाने भारावून जाऊन त्यांनी रोम विद्यापीठात सात वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केला. मनोविकास साधणारी नवीन पद्धती त्यांनी शोधून काढली व तिला मॉँटेसरी शिक्षणपद्धती असे नाव दिले. रोममध्ये त्याकाळी गृहनिर्माण समितीने बांधलेल्या प्रत्येक घरात शिशुगृह उघडण्याची संकल्पना मांडली. घरात राहणाऱ्या तीन ते सात वयोगटांतील मुलांना एकत्रित बसवून त्यांची देखरेख शिक्षिकेवर सोपवून तिनेही तिथे राहिले पाहिजे, ही पद्धत विकसित केली. परिणामी, मतिमंद बालकांच्या शिक्षणाला नवी दिशा मिळाली.

**- स्नेहा पाटणे**
बी. ए. भाग- १



Scanned with OKEN Scanner

हेलन अंध, बहिरी, मुकी असल्यामुळे विचार समजून घेणे, आपले विचार, इच्छा व्यक्त करण्यापुरते लेखन व वाचन शिकण्यामध्ये तिला समाधान नव्हते. ती जिद्दीने बोलावयास शिकल्यावर तिने पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले.

लहानपणापासून निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याची त्यांना आवड निर्माण झाली होती. १९०० या वर्षीच्या उन्हाळ्यात न्यू इंग्लंडमधील एका सुंदर खेड्यात एका रम्य पण अज्ञातस्थळी हेलन राहिल्या. तेथील शांत व निसर्गरम्य निसर्गाच्या, लहान मुलांच्या सान्निध्यात त्या रमल्या.

हेलन यांनी आपल्या शिक्षिकेच्या साहाय्याने जगात चमत्कार घडवून दाखवला. त्या वयाच्या ११ व्या वर्षी अक्षरशः बोलू लागल्या. हेलन यांनी जे अगाध ज्ञान मिळवले होते, ते त्यांच्या तोंडून ऐकून मोठमोठे विद्वान थक्क होत असे.

हेलन यांनी स्वप्रयत्नाने बी.ए. (ऑ.) ही पदवी मिळवली. एवढे ज्ञान मिळाल्यावर भरपूर अर्थार्जन करून त्यांना सुखात राहता आले असते; परंतु आपले पुढील आयुष्य त्यांनी अंध, अपंग अशा आपल्यासारख्या अभागी बंधू-भगिनींसाठी वाहून घेतले.

सन १९३१ या वर्षी अमेरिकन फाउंडेशन फॉर ब्लाइंड या संस्थेने जास्तीत जास्त निधी उभारण्याच्या कामगिरीबद्दल त्यांना पाच हजार डॉलर्सचे बक्षीस दिले. ते त्यांनी परत त्या संस्थेला देणगी म्हणून दिले. १९३८ या वर्षी अमेरिकेच्या राष्ट्रीय शैक्षणिक संघटनेने त्यांना सोन्याची किल्ली भेट म्हणून दिली.

स्टोरी ऑफ माय लाइफ (१९०३), दि साँग ऑफ द स्टोन वॉल (१९१०), मिड स्ट्रीट ऑफ माय लेटर लाइफ (१९३०), लेट अस हॅव फेथ (१९४०) ही पुस्तके लिहिली.

अशा या थोर विदूषीचा १ जून, १९६८ रोजी कनेक्टिकट राज्यात ईस्टन येथे निधन झाले. डॉ. हेलन केलर जग सोडून गेल्या तरी पुस्तके, केलेले का… अजरामर राहील. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी जे उदात्त व महान कार्य केले त्यामुळे डॉ. हेलेन केलर यांना जगातील आठवे आश्चर्य म्हणून ओळखले जाते इतकेच नव्हे, तर त्यांच्या जीवनावर आधारित 'हेलन केलर इन हर स्टोरी' व 'दि मिरॅकल वर्कर' हे चित्रपट तयार झाले. अशाप्रकारे त्यांचे आयुष्य दुर्दैवी अपंग व्यक्तींना स्फूर्तिदायक ठरेलच; परंतु इतरांनाही प्रेरणादायक होईल, यात शंकाच नाही.

**- रोशन काटोले**
वर्ग ११ वी (आर्टस्)

## पतंग उडवू चला...

पतंग उडवू चला...
गड्यांनो, पतंग उडवू चला!
रंग ढगांवर मावळतीचा,
लाल-पिवळसर किती मजेचा,
झुळझुळ वारा नदीकाठचा,
बाजूस डोंगरमळा!
करू चला सुरुवात बरोबर,
सोडा सोडा रीळ भराभर,
पतंग चढवा रे वाऱ्यावर,
ढगांस भेटायला!
मऊ मऊ वाळूत पाय रोवुनं
देऊ झटका दोरा ओढुनी,
पतंग जाती वर वर चढुनी,
पंख नको त्याजला!
जशी पाखरे आभाळात,
पंख पसरूनी तरंगतात,
दिसतील तैसे पतंग रंगीत,
खेळ किती चांगला...!



**- शुभम विष्णुरकर**
बी.ए. भाग-२



### मतिमंद मुलांकडे समाजाचे लक्ष वेधणाऱ्या

# मारिया मॉँटिसरी

मारिया मॉँटिसरी या इटालियन शिक्षणतज्ज्ञ होत्या. शरीरविज्ञान आणि मॉँटिसरी शिक्षणपद्धतीच्या जनक म्हणूनही त्या प्रसिद्ध आहेत. क्याराव्हाले या इटलीतील गावी त्यांचा जन्म झाला. १८९६ या वर्षी त्यांनी रोम विद्यापीठातून वैद्यकीय पदवी घेतली. ही पदवी प्राप्त करणाऱ्या त्या पहिल्या महिला होत्या. वृत्तपत्रांनी तिला सूर्यकिरण (सन रेज) म्हणून गौरवले. वैद्यकीय पदवीनंतर रोममधील सर्व रुग्णालयांतील रिकाम्या जागेसाठी झालेल्या स्पर्धेत त्यांनी भाग घेतला व यश प्राप्त केले. १८९७ या वर्षी युरोप खंडात अशा मानाच्या जागी निवडलेली ही पहिली महिला होय.

तुरीन येथे आयोजित (१८९८) वैद्यकीय परिषदेत भाग घेऊन त्यांनी - मतिमंद मुलांकडे दुर्लक्ष करणारा समाज व डॉक्टर हेच खरे गुन्हेगार असल्याचा विचार मांडला. त्यांच्या या स्पष्ट व सडेतोड विचारांचा परिणाम युरोपभर झाला. इटलीमध्ये त्यांनी मतिमंद मुलांसाठी संस्था स्थापन केली. मानसिक वैफल्य ही वैद्यकशास्त्राची समस्या नसून, शैक्षणिक समस्या असल्याचे त्यांना वाटले. मतिमंदांच्या शिक्षणपद्धतीचा त्यांनी अभ्यास केला. १८९९ या वर्षी लंडन येथे आयोजित पहिल्या परिषदेस इटालियन महिला प्रतिनिधी म्हणून त्या हजर होत्या.

१९०७ या वर्षी मॉँटिसरीबाईंनी रोमच्या गलिच्छ वस्तीत पहिली मॉँटिसरी शाळा - बालक मंदिर सुरू केले. वैद्यकीय व्यवसायातील प्रतिष्ठा हा मोह टाळून त्यांनी शैक्षणिक कार्यास स्वतःला वाहून घेतले. मतिमंद मुलांच्या मनोविकासासाठी त्यांच्या ज्ञानेंद्रियांची व स्नायूंची संचलनशक्ती विकसित करणे आवश्यक आहे, असे मत प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ एडवर्ट सेंग्विन यांनी मांडले. त्यांच्या या संशोधनाने मारिया मॉँटिसरी प्रेरित झाल्या. त्यांनी मतिमंदांच्या शिक्षणासाठी खास साहित्य तयार केले. परिणामी, मतिमंद मुले प्रगती करू शकली, तर काही मुले सर्वसामान्यांबरोबर काम करू शकली. या अनपेक्षित यशाने भारावून जाऊन त्यांनी रोम विद्यापीठात सात वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केला. मनोविकास साधणारी नवीन पद्धती त्यांनी शोधून काढली व तिला मॉँटिसरी शिक्षणपद्धती असे नाव दिले. रोममध्ये त्याकाळी गृहनिर्माण समितीने बांधलेल्या प्रत्येक घरात शिशुगृह उघडण्याची संकल्पना मांडली. घरात राहणाऱ्या तीन ते सात वयोगटांतील मुलांना एकत्रित बसवून त्यांची देखरेख शिक्षिकेवर सोपवून तिनेही तिथे राहिले पाहिजे, ही पद्धत विकसित केली. परिणामी, मतिमंद बालकांच्या शिक्षणाला नवी दिशा मिळाली.

**- स्नेहा पाटणे**
बी. ए. भाग- १





Scanned with OKEN Scanner



## आदिवासी बालकांच्या माता

# अनूताई वाघ

अनूताई वाघ यांचा जन्म १९१० या वर्षी व मृत्यू १९९२ या वर्षी झाला. अनंत अडचणींवर मात करण्याचे धैर्य व चिकाटी हे व्यक्तिगत गुण एखाद्या कार्यात यश संपादन करण्यासाठी कारण होतात. अशक्य कार्य या गुणांमुळे सिद्ध होतात. तसे कार्य करणाऱ्या व्यक्ती या लोकोत्तर गणल्या जातात.

कोसबाळचे वारली म्हणजे एक आव्हानच होते. शिक्षणापासून वंचित असणाऱ्या आणि एवढेच नव्हे, तर त्यांच्याशी शत्रुत्व करणाऱ्या या मुलांना आपण शिकत आहोत, असे वाटू न देता, ते त्यांच्या गळी उतरवण्याचे लोकविलक्षण खटाटोप करणाऱ्या अनूताई वाघ या २० व्या शतकातील एक लोकोत्तर महिला ठरतात. वैयक्तिक आयुष्यात मातृत्व तर नाहीच; पण विवाहितेचे सौभाग्यही क्षणिकच लाभलेल्या अनूताई शेकडो आदिवासी बालकांच्या माता झाल्या.

१७ मार्च, १९९० ला एका गरीब कुटुंबात अनूताईंचा जन्म झाला. १९२३ मध्ये वयाच्या १३ व्या वर्षी पुणे येथे त्यांचा विवाह श्री. शंकर वामन जातेगावकर यांच्याशी झाला. पहिली दिवाळी आणि जावयाचा दिवाळसण थाटात पार पडला. पण, विधीलिखित निराळेच होते. दिवाळीनंतर एका आठवड्यातच श्री. जातेगावकरांच्या निधनाची बातमी आली आणि वाघ कुटुंबावर दु:खाचा आघात झाला.

नोकरीच्या गावी मनमाड येथे सायंकाळी रेल्वेच्या कडेने फिरायला गेले असताना, रेल्वे इंजिनाचा धक्का लागून त्यांच्या पतीचा अपघाती मृत्यू झाला. त्यावेळी अनूताईंचे वय अवघे साडेतेरा वर्षांचे होते. त्यांच्या विवाहविषयक आयुष्याचा अध्याय उघडण्यापूर्वीच संपला.

**- अश्विनी लाळे**
बी.ए. भाग-१

## माय मराठी

माय मराठी
माझे मराठी
पाऊल
पडे काळजात खोल
सह्याद्रीच्या खाणाखुणा
जशी अमृताची वेल
माझे मराठी गाणे
जसे सुवर्णनाणे
पहाटेच्या देवाने
गंधीत होई राने
मायमराठी माती
शिवबा-तुकाची पाती
झाडे, पाने, फुले

कष्टाचे गीत
गाती
माझी मराठी
वाणी
जशी ओव्याची गाणी
इथल्या थेंबाथेंबांत
उमटे संतवाणी
हवेची शीतल झुळूक
मायमराठीची ओळख
वंदन करता हिला
दूर होई काळोख

**- पूजा पारिसे**
बी.ए. भाग-२





## थोर समाजसुधारक

# पंडिता रमाबाई

पंडिता रमाबाई या महाराष्ट्रातील एक थोर समाजसुधारक व विदूषी होऊन गेल्या. २३ एप्रिल, १८५८ रोजी मंगळूरजवळच्या गंगामूळ येथील डोंगरावर डोंगरे नावाच्या चित्पावन ब्राह्मण कुळात रमाबाईंचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अनंतशास्त्री आणि आईचे नाव लक्ष्मीबाई. दोघेही संस्कृत पंडित होते. तीर्थयात्रेसाठी अनंतशास्त्रींनी गंगामूळ सोडले, तेव्हा रमाबाई फक्त सहा महिन्यांच्या होत्या. रमाबाई पंधरा-सोळा वर्षांची होईपर्यंत तिच्या वडिलांनी प्रवासातच तिला संस्कृत काव्ये व शास्त्रे शिकवली. रमाबाई त्या वयातच पंडिता झाल्या.

पुढे हे कुटुंब पंधरा-सोळा वर्षांनी त्या काळाच्या मद्रास क्षेत्रात गेले. तेथे पडलेल्या मोठ्या दुष्काळामध्ये रमाबाईंच्या आई-वडिलांचा व मोठ्या बहिणीचा मृत्यू झाला. तरी रमाबाई व त्यांचा मोठा भाऊ श्रीनिवास यांनी तीर्थयात्रेचे व्रत पुढे चालू ठेवले. तीन-चार वर्षे चार-पाच हजार मैलांचा प्रवास त्यांनी पायी केला. प्रवासामध्ये ती दोघे पुराण सांगत व संस्कृतमधून व्याख्यान देत. पण, त्यांच्या या उपक्रमाचे कुणी कौतुक केले नाही. हिंडत ते दोघे कलकत्ता शहरात गेले. तिथे ब्राह्मो समाजाच्या पुढाऱ्यांनी आणि कलकत्ता विद्यापीठातील पंडितांनी त्यांच्या विद्येचा आदर केला आणि विद्यापीठात बोलावून त्यांचा सन्मान केला व त्यांना 'पंडिता सरस्वती' अशी उपाधी दिली. कलकत्त्याच्या वास्तव्यात त्यांचा भाऊ श्रीनिवास मृत्युमुखी पडला. त्यानंतर थोड्याच दिवसांनी त्यांनी बिपीनबिहारी दास मेधावी या सुशिक्षित, सुसंस्कृत पण शूद्र बंगाली पुरुषाशी विवाह केला. या आंतरजातीय व आंतरप्रांतीय विवाहाने त्याकाळात लोकमत फारच क्षुब्ध झाले. रमाबाईंना विवाहसौख्य फार काळ लाभले नाही. विवाहानंतर अवघ्या १९ महिन्यांत बिपीनबापू कॉलऱ्यामुळे कालवश झाले. बाईंना एक मुलगी झाली होती. तिचे नाव त्यांनी मनोरमा ठेवले. त्यानंतर त्या कलकत्त्याहून पुण्यात आल्या.

महाराष्ट्रात आल्यावर त्यांनी इंग्रजीचा अभ्यास करायचे ठरवले. पुण्यामध्ये बायकांच्या सभेत केरूनाना छत्रे त्यांना शिकवत असत. पुण्यातील या भगिनी मंडळातील प्रत्येकाच्या घरी दर आठवड्याला रमाबाईंनी पुराण सांगण्याचे ठरवले. पुराणाच्या माध्यमातून रमाबाईंनी आपल्या बुद्धिमत्तेने, विद्वत्तेने व वक्तृत्वाने सर्वांना चकित करून सोडले.

पुण्या-मुंबईत असणाऱ्या या महिलांच्या सभांना रमाबाईंनी 'आर्य महिला समाज' असे नाव दिले. इंग्रजी शिक्षणासाठी त्यांनी इंग्लंडला जाण्याचे ठरवले. 'स्त्रीधर्मनीती' हे पुस्तक लिहून त्याच्या विक्रीतून त्यांनी आपली स्वत:ची व कन्येच्या प्रवासखर्चाची तरतूद केली. इंग्लंडला गेल्यावर तिथे परित्यक्त स्त्रियांसाठी होत असलेले कार्य पाहून त्यांना फार



Scanned with OKEN Scanner

आश्चर्य वाटले. या वेळेचे मात्र त्यांना ख्रिस्तांच्या [illegible] त्यांनी व अमेरिका या दोघींनी बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्ती धर्म स्वीकारला.

१८८५ मध्ये अमेरिकेत फिलाडेल्फियाच्या येथील स्त्रियांच्या वैद्यकीय कॉलेजातील प्राचार्य डॉ. बॉडले यांनी रमाबाईंना अमेरिकेत येण्याचे निमंत्रण दिले. त्याच कॉलेजात आनंदीबाई जोशी शिकत होत्या. आनंदीबाईंनीही त्यांना अमेरिकेत येण्याचा आग्रह केला. आनंदीबाईंच्या पदवीदान समारंभाला त्या उपस्थित राहिल्या.

अमेरिकेतील स्त्रियांची प्रगती व तिथली शिक्षणपद्धती पाहून रमाबाई फार खुश झाल्या. भारतात परत गेल्यावर तिथल्या गरीब व अज्ञ बालविधवांसाठी संस्था काढायचा त्यांनी निश्चय केला. दरम्यान 'हिंदू वुमन' हे पुस्तक त्यांनी लिहिले.

अमेरिकेतून भारतात परत आल्यावर रमाबाईंनी १८८९ मध्ये 'शारदा सदन' नावाची संस्था मुंबईत स्थापन केली. त्यांनी ही संस्था पुण्यात आणली.

रमाबाईंनी इतरही सामाजिक कार्यात भाग घेतला. इंडियन नॅशनल काँग्रेसच्या इ. स. १८८९ मध्ये प्रथमच स्त्री प्रतिनिधी पाठवण्याच्या कामी त्यांनी पुढाकार घेतला. संमती वयाच्या बिलाला (विवाहविषयक) स्त्रियांचा पाठिंबा मिळवण्यासाठी त्यांनी मुंबई व पुणे येथे स्त्रियांच्या अनेक सभा बोलावल्या. त्याबाबतच्या एक अर्ज व्हाइसरॉयकडे पाठवला. अशा या उत्तुंग विचारांच्या महिलेला भारतीय समाज विसरणे केवळ अशक्य आहे.

**- राहुल जाधव**
बी.ए. भाग-३

## आयुष्य

कमळपत्रावरील पाण्याला कधी
थांब म्हणायचं नसतं,
निसटणाऱ्या क्षणाला कधी जवळ
करायचं नसतं,
माणसाचं आयुष्य असंच असतं,
खूप काही हरवलं तरी
त्यापेक्षा जास्त उरलेलं असतं.

**- सुषमा उपरीकर,** बी.ए. भाग-२

## फिर भी मेरा भारत महान है

भारत को गिरवी रखने की खोली दुकान है।।
लेता है कौन उसके परिवार की खबर
भारत के आबरू पर जो मरता जवान है।।
हैरत की बात है कि किसानों के देश में,
बेचारा खुद को फाँसी लगाता किसान है।।
जीना कठिन है, लोगों को मुश्किल में जाना है।
दिल फिर भी कह रहा है कि भारत महान है ।।
जनता की देखभाल लुटेरे करेंगे अब
सरकार ने लुटेरों को दे दी कमान है।।
सत्ता के ठेकेदारों ने संसद भवन से दूर
सच्चाईयों के सामने ये क्यों भला खुले,
दौलत से बंद की हुई सरवर जुबान है।।

**- रोशनी नागदेवे**
बी.कॉम. भाग-१








## अनाथांची माई
# सिंधूताई सपकाळ

अनाथ मुलांचा स्वत:च्या मुलांप्रमाणे सांभाळ करणाऱ्या सिंधूताई सपकाळ यांचे जीवन आपल्या सर्वांना प्रेरणा देणारे आहे. सिंधूताईंचे गाव अतिशय मागासलेले होते. सिंधूताई ही सर्वांत मोठी मुलगी. मुलीने शिकावे, अशी वडिलांची इच्छा होती. पण, आईचा सक्त विरोध असल्याने त्यांना गुरे राखायला जावे लागे. माई गुरे राखायला म्हणून जायच्या आणि शाळेत जाऊन बसायच्या. अशा विरोधी वातावरणात त्यांना फक्त चवथीपर्यंत शिकता आले. अल्पवयातच त्यांचा विवाह झाला. अठराव्या वर्षापर्यंत त्यांची तीन बाळंतपणं झाली. चवथ्या वेळी गर्भवती असताना त्यांनी त्यांच्या आयुष्यातील पहिला संघर्ष केला आणि समाजासाठी आजतागायत त्या संघर्षच करीत आहेत.

त्या काळी गुरे वळणे हा व्यवसाय असायचा. गुरेही शेकडोंनी असायची. त्यांचे शेण काढता काढता महिला अर्धमेल्या व्हायच्या. पण, त्याबद्दल त्यांना कोणतीही मजुरी मिळायची नाही. या शेणाचा लिलाव जंगल खात्याचे लोक करायचे. सिंधूताईंनी इथे बंड पुकारला. शेण काढणाऱ्या महिलांना मजुरी मिळायला हवी, हा त्यांचा आग्रह होता. त्या लढा जिंकल्या. या लिलावात ज्यांना हप्ता मिळायचा, त्यांच्या हप्त्यावर गदा आली. त्यामुळे त्यांनी पुकारलेल्या बंडाची त्यांना जबर किंमत चुकवावी लागली.

त्यांच्या पतीने त्यांना बेदम मारहाण करून घराबाहेर काढले. कामाच्या शोधातच त्या चिखलदऱ्याला पोहोचल्या. तिथे स्थानिक आदिवासी व मध्य प्रदेशातील मजूर रस्ता बांधण्याचे काम करीत होते. माईंनी तिथल्या मजुरांची मुलं सांभाळण्याचे काम सुरू केले. काम संपल्यावर सिंधूताई मजुरांसोबत पुण्याला आल्या. एकदा रस्त्यात त्यांना एक अनाथ मुलगा सापडला. त्याला घेऊन त्या पोलिस ठाण्यात गेल्या. पोलिसांनी त्यांना तिथून हाकलून लावले. सिंधूताईंनी त्या मुलाचा सांभाळ करण्याचा निर्णय घेतला. मुलांचा सांभाळ करता करता आपल्याही जगण्याला काही अर्थ मिळेल, असे त्यांना वाटले आणि त्यांनी आपल्या जीवनाची दिशा निश्चित केली.

मुलांचा सांभाळ करायचा म्हणजे पैशांचा प्रश्न आलाच. आकाशवाणीवर आणि दूरदर्शनवर त्यांना गीत गायनाचे कार्यक्रम मिळाले आणि त्यातूनच त्यांचे अर्थार्जन झाले. ते पैसे घेऊन त्या चिखलदऱ्याला आल्या आणि एक झोपडी बांधून आपला आश्रम थाटला. हळूहळू मुलांची संख्या वाढू लागली. आज त्या हजारो अनाथ मुलांची माई म्हणून काम करीत आहेत. त्यांना प्रेम तर त्या देतच आहेत; याशिवाय त्यांचे शिक्षणही पूर्ण करीत आहेत. आज त्यांची मुलं मोठमोठ्या पदांवर आहेत, हे सांगताना त्यांचा ऊर अभिमानाने भरून येतो.

**- नीलम खडतकर,** बी. ए. भाग -३



Scanned with OKEN Scanner



## भारताची सुवर्णकन्या

# पी. टी. उषा

भारताची सुवर्णकन्या म्हणून पी. टी. उषा हिचे नाव सर्वांना सुपरिचित आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये पी. टी. उषा हिने भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. १९४६ मध्ये तिचा जन्म झाला. तिचे पूर्ण नाव पाडवुल्लाखंडी यक्केपरमबिलां असे आहे. तिला बालपणापासूनच खेळाची आवड होती.

१२ व्या वर्षी तिने प्रख्यात प्रशिक्षक ओ. एम. नम्बियार यांच्याकडे खेळाचे प्रशिक्षण घेतले. १९८४ या वर्षी लॉस एंजिलिस येथे आयोजित केलेल्या २३ व्या ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये पी. टी. उषाने ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत भाग घेतला. हे तिला एक आव्हानच होते. ऑलिम्पिक खेळांच्या स्पर्धेत फायनलपर्यंत पोहोचू शकलेली ती प्रथम भारतीय महिला धावपटू आणि पाचवी भारतीय खेळाडू ठरली. तिने आपली श्रेष्ठता सिद्ध केली. १९८९ या वर्षी तिला राष्ट्रीय पातळीवर अनेक पुरस्कार प्राप्त झाले.

त्यानंतर दक्षिण कोरियातील सेऊल येथे झालेल्या २४ व्या ऑलिम्पिक स्पर्धेत तिला चार सुवर्णपदके आणि एक रौप्यपदक मिळाले.

क्रीडा विश्वात हा एक प्रकारचा चमत्कारच म्हणावा लागेल. वैयक्तिक सुवर्णपदके मिळवण्याचा मान तिला मिळाला. 'भारताची सुवर्णकन्या' म्हणून तिचा गौरव केला गेला. चीनच्या क्रीडा पत्रकार संघटनेने १९८९ या वर्षातील आशिया खंडातील दहा सर्वोत्कृष्ट खेळाडूंमध्ये पी. टी. उषाची निवड केली. चीनमध्ये 'भारताची सर्वोत्कृष्ट ॲथलिट' म्हणून पी.टी. उषा ओळखली जाते.

जकार्ता येथे आयोजित केलेल्या सहाव्या एशियन ट्रॅक अँड फिल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेत १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर तसेच ४ x ४०० मीटर रिले धावण्याच्या स्पर्धेत तिने पाच सुवर्णपदके प्राप्त केली. यामुळे पी. टी. उषा हिला आशियाची धावण्याच्या स्पर्धेत 'चमकणारा तारा' म्हणून गौरवले गेले. यापूर्वी कोणत्याही भारतीय पुरुष वा महिला धावपटूला असा गौरव प्राप्त झाला नाही.

भारत सरकारने पी. टी. उषाचा १९८५ मध्ये 'अर्जुन पुरस्कार' देऊन सन्मान केला. तिच्या या अतुलनीय कामगिरीबद्दल केरळ शासनाने एका मार्गाला तिचे नाव दिले आहे.

१९९१ या वर्षी तिचा विवाह के. श्रीनिवासन यांच्याशी झाला. आपल्या कौटुंबिक जीवनातही पत्नी व माता ही दुहेरी भूमिका ती उत्तमरीत्या पार पाडत आहे. एवढेच नव्हे, तर तिने सध्याच्या युवा महिला धावपटूंसाठी सन २००० मध्ये केरळ येथे 'स्पोर्ट ॲकॅडमी' सुरू केली आहे. खरोखरच ती अभिनंदनास पात्र आहे.

- पूजा सोनवंशी
बी.कॉम. भाग-३



# रेणुका कॉलेज, नागपूर
# आणि
# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
# व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, मराठी प्राध्यापक परिषद

### यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र
### (One Day National Seminar)

## मराठी भाषा व साहित्य अभ्यासक्रम : स्वरूप आणि समीक्षा

रेणुका कॉलेज, नागपूर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, मराठी प्राध्यापक परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने रेणुका कॉलेज, बेसा, नागपूर येथे ८ ऑक्टोबर, २०१६ रोजी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. नवीन अभ्यासक्रमावर आधारित या एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचा विषय 'मराठी भाषा व साहित्य अभ्यासक्रम : स्वरूप आणि समीक्षा' हा होता.

शिक्षक आमदार मा. श्री. नागोजी गाणार, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, कला अधिष्ठाता मा. डॉ. प्रमोद शर्मा यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. तायवाडे महाविद्यालय, कोराडी येथील मा. प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे ह्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, विभागप्रमुख मा. डॉ. शैलेंद्र लेंडे हे कार्यक्रमाचे चर्चासत्राध्यक्ष होते, त्यांनी बीजभाषणही केले. उस्मानिया विद्यापीठ, हैदराबादच्या विभागप्रमुख मा. डॉ. नम्रता बागडे, श्रीमती रा. बा. तिडके कला, वाणिज्य महाविद्यालय मौदा, प्राचार्य मा. डॉ. विनोद गावंडे हे विशेष अतिथी होते. समारंभाध्यक्ष म्हणून रे.शि.प्र.मं., नागपूर अध्यक्ष मा. हिमांशु गेडाम तसेच रे.शि.प्र.मं., नागपूर, सचिव मा. मंजूषा मानवटकर उपस्थित होत्या. स्वागताध्यक्ष म्हणून रेणुका कॉलेज, नागपूर, प्राचार्य मा. डॉ. ज्योती पाटील होत्या. प्रथम सत्राध्यक्ष म्हणून नारायणराव कॉलेज, स्मृती मॉडेल कॉलेज, कारंजा, मा. डॉ. गणेश मोहोड होते. वक्ते म्हणून डॉ. सोपानदेव पिसे, डॉ. इंद्रजित ओरके, डॉ. गिरीश सपाटे होते. तर द्वितीय सत्राध्यक्ष म्हणून मारोतराव पानतावणे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, कांद्री, कन्हान, प्राचार्य मा. डॉ. प्रदीप विटाळकर उपस्थित होते. वक्ते म्हणून प्रा. साधना जाधव, डॉ. सुरेश वर्धे, डॉ. राजेंद्र वाटाणे होते.



समारोपीय चर्चासत्रात अध्यक्ष म्हणून मा. डॉ. शैलेंद्र लेंडे उपस्थित होते. आयोजक डॉ. प्रेमा चोपडे लेकुरवाळे यांनी समालोचन केले. संचालन डॉ. अतुल महाजन, डॉ. अशोक भक्ते, डॉ. कैलाश पुलमाळी, डॉ. संतोष गेडेकर यांनी केले तर आभार प्रा. प्रवीण धारपुरे, प्रा. विनोद भालेराव यांनी मानले. चर्चासत्राची फलश्रुती म्हणून डॉ. दत्तात्रय वाटमोडे, डॉ. विनोद राऊत यांनी आपले मत नोंदविले. प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी असा एकूण १५० संशोधकांचा सहभाग होता.

# एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रातील अविस्मरणीय क्षण



राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‌घाटन करताना
मा. डॉ. शरयू तायवाडे, मा. डॉ. प्रमोद शर्मा व इतर मान्यवर



कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना
शिक्षक आमदार, मा. श्री. नागोजी गाणार



कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना
रा.तु.म. नागपूर विद्यापीठाचे कला अधिष्ठाता मा. डॉ. प्रमोद शर्मा



अभ्यासक्रमाबाबत चर्चा करताना
मा. डॉ. शरयू तायवाडे



चर्चासत्रामध्ये विषयाच्या अनुषंगाने विचार व्यक्त करताना
मा. डॉ. नम्रता बागडे, उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद



राष्ट्रीय चर्चासत्रात शुभेच्छा देताना रेणुका शिक्षण प्रसारक
मंडळाचे अध्यक्ष मा. हिमांशू गेडाम



राष्ट्रीय चर्चासत्रात प्रस्तावना सादर करताना मा. डॉ. ज्योती पाटील



राष्ट्रीय चर्चासत्रात आपले मत मांडताना मा. डॉ. इंद्रजीत ओरके



आपले विचार प्रकट करताना प्रथम सत्राध्यक्ष मा. डॉ. गणेश मोहोड, नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज, कारंजा

Scanned with OKEN Scanner



आपले विचार प्रकट करताना
द्वितीय सत्राध्यक्ष
डॉ. प्रदीप विटाळकर
प्राचार्य, मारोतराव पानतावणे
कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, कांद्री, कन्हान



समारोपीय भाषण करताना
राष्ट्रीय चर्चासत्राध्यक्ष
डॉ. शैलेंद्र लेंडे
मराठी विभाग प्रमुख
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर



चर्चासत्राची फलश्रुती
सांगताना
डॉ. दत्तात्रय वाटमोडे



# निर्भय, साहसाचे दुसरे नाव
# सावित्रीबाई फुले

समाजक्रांतीची मशाल महाराष्ट्रात सर्वप्रथम महात्मा जोतिबा फुले यांनी पेटवली. त्याचप्रमाणे रूढी-परंपरेत जखडलेल्या स्त्रियांना मुक्त करण्यासाठी जोतिबांच्या पत्नी सावित्रीबाईंनी पुढाकार घेतला. स्त्रीशिक्षणासाठी त्यांनी स्वतःला वाहून घेतले. त्यासाठी सर्वप्रथम त्या स्वत: शिक्षित झाल्या.

सातारा जिल्ह्यातील शिरवळपासून तीन मैलांवर नागाव नावाचे खेडे होते. गावाची वस्ती दोन हजारांची. सावित्रीबाई तेथील पाटील खंडोजी नेवसे यांची कन्या. ३ जानेवारी, १८३१ रोजी सावित्रीबाईंचा जन्म झाला.

सावित्रीबाई बालपणापासूनच साहसी होत्या. भीती हा शब्दच त्यांच्या शब्दकोषात नव्हता. विहिरीच्या काठावर उभी राहून किंवा मोटेच्या चाकावर उभी राहून सावित्रीबाई विहिरीत झेप घेत असे. बालपणापासूनच त्या प्रकृतीने निरोगी व मनाने कणखर होत्या. कोणावरही अन्याय झालेला सावित्रीबाईंना खपत नसे. दीनदुबळ्यांच्या साहाय्याला ती पटकन पुढे जाई.

एके दिवशी सावित्रीबाई मावशीकडे गेल्या. घरी परत येताना आभाळ भरून आले. विजा चमकू लागल्या. गारा पडू लागल्या. धुवांधार पाऊस सुरू झाला. पण, सावित्रीबाई घाबरल्या नाहीत. अंधार पडायच्या आत घरी यायचे आई-वडिलांना दिलेले वचन त्यांनी पूर्ण करून दाखवले.

स्त्रीशिक्षणाचा प्रयोग स्वतःच्या घरापासून करावयाचे जोतिबांनी ठरवले. शेतातील आंब्याचे झाड शाळा झाली. शेतीतील माती पाटी झाली. झाडाची फांदी लेखणी बनली. अक्षरे गिरवण्यास प्रारंभ झाला. शाळेतल्या विद्यार्थिनी होत्या सावित्रीबाई व बहीण सगुणाबाई. १८८८ मध्ये पुणे येथे बुधवारपेठेत भिड्यांच्या वाड्यात जोतिबांनी मुलींची पहिली शाळा सुरू केली; परंतु मुलींना शिक्षण म्हणजेच अधर्म मानणाऱ्या पुण्यातील ब्राह्मण वर्गाने अकांडतांडव सुरू केला.

सावित्रीबाईंनी संत चोखामेळा मंदिरात शाळा सुरू केली. अतिशूद्रांच्या मुलांना सगुणाबाई शिकवू लागल्या. शिक्षिका म्हणून काम करणाऱ्या सावित्रीबाई महाराष्ट्रातील पहिल्या महिला. त्या रोज मुलींना स्वत: बरोबर शाळेत घेऊन यायच्या. त्या आजारी मुलींच्या घरी जात. मुलींवर माया करत. त्यामुळे मुलींना त्या प्रिय झाल्या. १८४९-५० पर्यंत सावित्रीबाईंच्या शाळेतील मुलींची संख्या ७० पर्यंत गेली.

सावित्रीबाईंचे लेखन, काव्य यात क्रांतीची बीजे होती. आपल्या मनी-मानसी उमटणाऱ्या विचारांना शब्दरूप देणाऱ्या त्या लेखिका होत्या. त्यांच्या



Scanned with OKEN Scanner

विचारांची, कार्याची त्यावेळी टिंगलटवाळीच केली गेली. आज मात्र सावित्रीबाईंच्या कार्याची थोरवी गायला लहान-मोठ्या समाजपंडितांच्या जिव्हा थकत नाहीत. आज सावित्रीबाईंच्या विचारांचा विजय झाला आहे, असे म्हणावे लागेल.

सावित्रीबाईंच्या कार्याला उच्चवर्णीयांचा विरोध होता. तसाच त्यांच्या स्वकीयांतही असंतोष होता. खुद्द त्यांच्या माहेरी त्यांच्या सख्ख्या भावाला, कुटुंबीयांना त्यांचे वागणे पटत नव्हते.

एकदा सावित्रीबाई नायगावला असताना एक घटना घडली. गणेश नावाचा ब्राह्मण या गावात येऊन राहिला होता. तो पंचांग उत्तम सांगे. कीर्तनही चांगले करी. गावात त्याचा बोलबाला झाला. मिळकतही बऱ्यापैकी होऊ लागली. तेव्हा त्याने तिथेच राहण्याचा निश्चय केला. याच गावात राहणाऱ्या सारजा नावाचा महार मुलीकडे तो आकर्षित झाला. दोघांचे प्रेम जमले. गाठीभेटी सुरू झाल्या. ही बातमी गावात फुटली. गावात चर्चा सुरू झाली. गणेशने सारजाशी लग्न करण्याचा निश्चय व्यक्त केला. या घटनेने सनातन्यांचे पित्त खवळले. दोघा प्रेमिकांना मारहाण झाली. त्यांची गाढवावरून धिंड काढली. धिंड सुरू असताना जाणारे-येणारे चपलाही मारत होते. गावाबाहेर नेऊन त्यांना जिवंत जाळून मारायचे ठरले होते. सावित्रीबाईंना हे कळताच त्यांनी मिरवणुकीची वाट अडवली. सर्व सनातन्यांना दम दिला. "तुम्ही या लोकांवर अन्याय केला तर मी इंग्रज अधिकाऱ्यांना सांगेन व तुम्हाला तुरुंगात पाठवीन." तेव्हा लोकांनी या जोडीला ठार मारण्याचा बेत सोडून दिला. पण, या जोडीने गाव सोडून जावे, अशी मागणी केली. सावित्रीबाईंनी ते मान्य केले आणि गंडांतर टळले. दोघांनी सावित्रीबाईंना नमस्कार करून त्यांचा आशीर्वाद घेतला.

**- अंजू मोहबे**
११वी (कला)

## वह खून कहो किस मतलब का

वह खून कहो किस मतलब का...
वह खून कहो किस मतलब का
जिसको उबाल का नाम नहीं।
वह खून कहो किस मतलब का
आ सके देश के काम नहीं।
वह खून कहो किस मतलब का
जिसमें जीवन, न रवानी है
जो परवश होकर बहता है
वह खून नहीं है, पानी है।
उस दिन लोगों ने सही-सही
खून की कीमत पहचानी थी
जिस दिन सुभाष ने बर्मा में
मांगी उनसे कुर्बानी थी।
बोले, स्वतंत्रता की खातिर
बलिदान तुम्हें करना होगा
तुम बहुत जी चुके हो जग में,
लेकिन आगे मरना होगा।
आजादी के चरणों में,
जयमाला चढ़ाई जाएगी
वह सुनो तुम्हारे शीशों के
फुलों से गुँथी जायेंगी
आजादी का संग्राम कहीं
पैसे पर खेला जाता है।
यह शीश कटाने का सौदा
नंगे सर झेला जाता है।
आजादी का इतिहास कहीं
काली स्याही लिख पाती है।
इसके लिखने के लिए खून
की नदी बहाई जाती है।
यूँ कहते-कहते वक्ता की
आँखों में खून उतर आया।
मुख रक्त-वर्ण दमक उठा
दमकी उनकी रक्तिम काया।
आजानु-बाहू ऊँची करके,
वे खोले, "रक्त मुझे देना।
इसके बदले में भारत की
आजादी तुम मुझसे लेना।
हो गई सभा में उथलपुथल
सीने में दिल न समाते थे।
स्वर इन्कलाब के नारों के
कोसों तक छाए जाते थे।

**- ममता लांजेवार**
कला भाग-२





### पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या प्रवर्तक

# ताराबाई मोडक

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या प्रवर्तक म्हणून ताराबाई मोडक यांचे नाव आदराने घेतले जाते. चाकण (जि. पुणे) येथील केळकर घराण्यातील ताराबाईंचा जन्म मुंबई येथे झाला. १९१४ या वर्षी त्या बी.ए. झाल्या. महाविद्यालयीन काळात त्यांची कृष्णा वामनराव मोडक यांच्याशी ओळख झाली. १९१५ या वर्षी त्यांचा नोंदणी पद्धतीने विवाह झाला, पण त्या विवाहाला दोन्ही घरांचा विरोध होता. मोडक अमरावती येथे वकिली करत. त्यांना एक मुलगी झाली. १९२१ मध्ये गिजुभाई बढेका यांच्या साहाय्याने त्यांनी मॉंटेसरीच्या शिक्षणतत्त्वावर आधारित जीवन शिक्षणपद्धती निश्चित केली. शिक्षणाचा खरा पाया हा बालवयातच घातला जातो, यादृष्टीने त्यांनी पूर्वप्राथमिक शिक्षणक्षेत्रात पाऊल टाकले. त्यांच्या बालशिक्षण कार्याचा प्रारंभ झाला. त्या बार्टन फिमेल ट्रेनिंग कॉलेजच्या प्राचार्य झाल्या. त्यानंतर त्यांनी नऊ वर्षे भावनगर शिक्षण संस्थेत प्राध्यापिका म्हणून काम पाहिले. १९३६ या वर्षी त्यांनी दादर येथे हिंदू कॉलनीत शिशुविहार संस्था स्थापन करून बालशिक्षण प्रसाराचे कार्य सुरू केले. मराठी व गुजराती या दोन्ही भाषांमधून शिकून हजारहून अधिक शिक्षिकांना त्यांनी प्रशिक्षण दिले. या शिक्षिका त्यांच्या संस्थेतून शिक्षण प्रचारार्थ बाहेर पडल्या.

गिजुभाईंच्या मृत्यूनंतर पुढील १२ वर्षे त्यांनी नूतन बालशिक्षण संघाची धुरा सांभाळली. ग्रामीण भागात बालशिक्षण प्रसार करणे हे या संघाचे काम होते. १९४५ या वर्षी त्यांनी बोर्डी (जि. ठाणे) येथे ग्रामीण बालशिक्षण केंद्र स्थापन केले. या संस्थेतूनच ग्रामीण बालवाडी व ग्राम बाल अध्यापन मंदिर या संस्था निघाल्या. आदिवासी मुलींना या संस्थांचा लाभ मिळाला. आदिवासी परिसरात व अंगणातच बालवाडी चालवण्याचा उपक्रमही त्यांनी सुरू केला. १९५७ नंतर बोर्डी येथील ग्राम बाल शिक्षा केंद्र हे कोसबाड येथे हलवण्यात आले. आदिवासी मुलांसाठी कुरणशाळा, रात्रशाळा, व्यवसाय शिक्षण हे पूरक प्रकार प्रायोगिक तत्त्वावर सुरू झाले. शिक्षणातील नवीन प्रयोग तेथे सुरू झाले. आदिवासी भागातील एक शिक्षकी शाळांमधील मुलांचे बुद्धिमापन केले गेले. त्यावर संशोधन करून नवीन अभ्यासक्रम, बालसाहित्य निर्मिती, विज्ञान शिक्षण प्रयोग सुरू करण्यात आले. हे सर्व करताना त्यांनी मॉंटेसरीच्या मूळ तत्त्वांना धक्का लागू दिला नाही. त्यांचे शिक्षण एका बाजूने राष्ट्रीय तर दुसऱ्या बाजूने वैश्विक होते. ताराबाईंनी ग्रामीण बालशिक्षण संघाच्या चिटणीस म्हणूनही काम पाहिले. 'शिक्षण पत्रिका' मासिक त्यांनी सुरू केले. महाराष्ट्र विधानसभेच्या त्या सदस्या होत्या. आदिवासी मुलांचे जीवन विकसित करण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. त्यांनी व गिजूभाईंनी १०५ पुस्तके लिहिली, संपादित केली. यामध्ये बालनाटक, लोककथा व लोकगीतांचा प्रामुख्याने समावेश आहे.

**- आशंका वेरूळकर,** बी.ए. भाग-३



Scanned with OKEN Scanner



## भारतातील पहिल्या महिला डॉक्टर

# आनंदीबाई जोशी

आनंदीबाई जोशी यांचा जन्म ३१ मार्च, १८६५ रोजी आजोळी, पुण्यात झाला. आनंदीबाईंचे पूर्वाश्रमीचे नाव यमुना होते. जुन्या कल्याण परिसरातील पारनाका येथे राहणाऱ्या गणपतराव अमृतेश्वर जोशी यांच्या त्या ज्येष्ठ कन्या. वयाच्या नवव्या वर्षी बालपणातच त्यांचा विवाह वयाने २० वर्षांनी ज्येष्ठ असणाऱ्या गोपाळराव जोशी यांच्याशी झाला. लग्नानंतर गोपाळरावांनी आपल्या पत्नीचे यमुना हे नाव बदलून आनंदीबाई असे ठेवले. गोपाळराव कल्याणला पोस्ट ऑफिसात कारकून होते. आपल्या पत्नीला शिक्षणात रस आहे, हे गोपाळरावांनी जाणले होते. तिला इंग्रजी शिकवण्याचा त्यांनी निश्चय केला. लग्नानंतर आनंदीबाईंनी वयाच्या १४ व्या वर्षी एका मुलास जन्म दिला; परंतु दुर्दैवाने पुरेशी वैद्यकीय सुविधा न मिळाल्याने तो केवळ दहाच दिवस जगू शकला. हीच खंत आनंदीबाईंना वैद्यकीय शिक्षणाकडे खेचून आणण्यास कारणीभूत ठरली.

आनंदीबाईंनी शिकून डॉक्टर होण्याचा निर्णय घेतला. गोपाळरावांनी यासंदर्भात अमेरिकेशी पत्रव्यवहार केला; परंतु हे शिक्षण घेण्यासाठी ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याची अट होती आणि धर्मांतर करणे तर या जोडप्यास मान्य नव्हते. मात्र, त्यांनी प्रयत्न सोडले नाहीत. पुढे आनंदीबाईंची तळमळ आणि गोपाळरावांची चिकाटी फळाला आली. या दोघांना अपेक्षित असेच घडले आणि आनंदीबाईंना ख्रिस्ती धर्म न स्वीकारता १८८३ मध्ये वयाच्या एकोणिसाव्या वर्षी विमेन्स मेडिकल कॉलेज ऑफ पेनसिल्व्हेनियामध्ये प्रवेश मिळाला. दरम्यान, नवीन वातावरण आणि प्रवासातील दगदग यांमुळे आनंदीबाईंची प्रकृती खूप ढासळली होती. मात्र, अमेरिकेतील एका जोडप्याच्या मदतीमुळे सर्व काही पार पडत गेले.

सुरुवातीला तत्कालीन समाजाकडून या कामाला खूप विरोध करण्यात आला. आनंदीबाईंनी कलकत्त्यामध्ये एक भाषण केले. तेव्हा त्यांनी भारतामध्ये महिला डॉक्टरांची किती आवश्यकता आहे, हे पटवून दिले आणि हे स्पष्ट सांगितले की, मला यासाठी धर्मांतर वगैरे करण्याची काही गरज नाही. मी माझा हिंदू धर्म व संस्कृती यांचा कदापि त्याग करणार नाही. मला माझे शिक्षण पूर्ण झाल्यावर भारतात येऊन महिलांसाठी एक वैद्यकीय महाविद्यालय सुरू करायचे आहे, असा निर्धार त्यांनी आपल्या भाषणात जाहीर केला. आनंदीबाईंचे हे भाषण लोकांना खूप आवडले. त्यामुळे त्यांना होणारा विरोध तर कमी झालाच; पण त्यांना या कार्यात हातभार म्हणून सबंध भारतातून आर्थिक मदत जमा झाली. भारताचे तत्कालीन व्हॉइसरॉय यांनीसुद्धा दोनशे रुपयांचा फंड जाहीर केला.

कष्टाच्या आणि जिद्दीच्या जोरावर अभ्यासक्रम पूर्ण करून मार्च इ.स. १८८६ मध्ये आनंदीबाईंना एम.डी.ची पदवी मिळाली. एम.डी. साठी त्यांनी जो प्रबंध सादर केला, त्याचा विषय होता, 'हिंदू आर्य लोकांमधील प्रसूतिशास्त्र'. एम.डी. झाल्यावर व्हिक्टोरिया राणींकडूनसुद्धा त्यांचे अभिनंदन झाले. या खडतर प्रवासात त्यांना गोपाळरावांचा पाठिंबा होता. तिच्या पदवीदान समारंभाला गोपाळराव स्वत: उपस्थित राहिले. यावेळी पंडिता रमाबाईदेखील उपस्थित होत्या. 'भारतातील पहिली स्त्री डॉक्टर' म्हणून सर्व उपस्थितांनी उभे राहून जोरदार टाळ्या वाजवून आनंदीबाईंची प्रशंसा केली. त्यांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण झाले होते.

आनंदीबाईंना कोल्हापूरमधील अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटलमधील स्त्री कक्षाचा ताबा देण्यात आला. पुढे वयाच्या विशीतच त्यांना क्षयरोग झाला आणि २६ फेब्रुवारी इ.स. १८८७ रोजी त्यांना पुण्यात मृत्यू आला. केवळ २१ वर्षांच्या जीवनयात्रेत आनंदीबाईंनी भारतीय स्त्रियांसाठी प्रेरणादायी जीवन आदर्श उभा केला. दुर्दैवाने आनंदीबाईंच्या बुद्धिमत्ता आणि ज्ञानाचा फायदा जनतेला होऊ शकला नाही. मात्र, 'चूल आणि मूल' म्हणजेच आयुष्य असं समजणाऱ्या महिलांना त्या काळात आनंदीबाई जोशी यांनी आदर्श व मानदंड घालून दिला. एकीकडे सावित्रीबाई व जोतिबा स्त्री शिक्षणासाठी खस्ता खात असतानाच आनंदी-गोपाळ हे जोडपे आपले ध्येय प्राप्त करण्यासाठी झटत होते. जिद्द आणि चिकाटी असेल तर कोणतेही काम अशक्य नाही. समाजात राहून काम करायचे तर अडथळे येणारच. मात्र, त्यावर मात करून आपले ध्येय प्राप्त करून दाखवणे, यातच जीवनाची खरी सार्थकता आहे, असे आनंदीबाईंच्या आयुष्यावरून उमजते.

**- शिल्पा मून**
बी. ए. भाग-२

## उत्कृष्ट विचार

- पानी जैसे बनो, जो अपना रास्ता खुद बनाता है। पत्थर जैसे नहीं, जो दूसरों का रास्ता भी रोक लेता है।
- हम अपने जीवन में अवश्य सफल होंगे, यदि हम उन सब सलाहों को माने जो हम दूसरों को देते है।
- वही जीवित है जिसका मस्तिष्क ठंडा, रक्त गरम, हृदय कोमल और पुरुषार्थ प्रखर है।
- अपने कर्तव्य का निर्वाह करने वाले जीव के चित्त में स्वाभाविक प्रसन्नता रहती है।
- संसार की कामना से पशुता और भगवान की कामना से मनुष्यता का आरंभ होता है।
- सभी के साथ सौम्य और अपने लिए कठोर रहिये।
- यदि सफल होना चाहते हों, तो पहले अपने अभिमान का नाश कर डालो।
- संसार के काम में नफा और नुकसान दोनों हैं। पर प्रभु के काम में नफा ही नफा है।
- सफलता एक असफलता से दूसरी असफलता तक बिना उत्साह खोए प्रयत्न करने से मिलती है।

**- सिमरन सोनकर**
(१२वी कला)







Scanned with OKEN Scanner



खूब लड़ी मर्दानी...

# झाशीची राणी लक्ष्मीबाई

राणी लक्ष्मीबाई यांना आपण झाशीची राणी म्हणून ओळखतो. या झाशीच्या राणीचा जन्म १८ नोव्हेंबर, १८३५ मध्ये बनारस येथे झाला. झाशीच्या राणीचे मूळ नाव मनकर्णिका होते. त्यांना कौतुकाने 'मनू' असे म्हणत. मनू घरात सर्वांची लाडकी होती आणि या महान अशा स्त्रीला जन्माला घालणारे म्हणजे त्यांचे आई-वडील हे बनारसमध्ये राहणारे होते. त्यांच्या वडिलांचे नाव मोरोपंत तांबे तर आईचे नाव भागीरथीबाई होते. भागीरथीबाई या स्वभावाने प्रेमळ होत्या. त्यांचे राणी लक्ष्मीबाईवर खूप प्रेम होते.

लहानपणी राणी लक्ष्मीबाई वडिलांबरोबर ब्रह्मावर्त येथे आल्यावर दुसऱ्या बाजीरावांचे दत्तकपुत्र नानासाहेब आणि त्यांचे बंधू रावसाहेब यांच्याबरोबर हसण्या-खेळण्यात त्यांचे लहानपण गेले होते. त्या रावसाहेबांबरोबर घोड्यावर बसायला शिकत होत्या. शस्त्रास्त्रांचे शिक्षण घेत होत्या. खोट्याखोट्या लढाया खेळत होत्या. तलवारबाजी तर त्यांना अतिशय आवडत होती.

राणी लक्ष्मीबाईंचा विवाह १८४३ मध्ये झाशी संस्थानचे प्रमुख सुभेदार गंगाधरराव यांच्याशी झाला. गंगाधरपंतांशी विवाह झाल्यानंतर त्या झाशीच्या राणी झाल्या. १८५१ या वर्षी त्यांना पुत्ररत्न झाले. पण, अवघ्या दोन वर्षांत राणीसाहेबांचा मुलगा गेला. त्या धक्क्याने गंगाधरपंत आजारी पडले. त्यांचे त्यांच्या पुत्रावर खूप प्रेम होते. पण, तो गेल्यावर आता राजगादीवर बसवायचे कुणाला, असा प्रश्न राजघराण्याला पडला म्हणून त्यांनी नात्यातल्याच 'दामोदर' नावाच्या मुलाला दत्तक घेतले. थोड्यात दिवसांनी गंगाधरपंतांचा मृत्यू झाला. २० नोव्हेंबर, १८५३ यावर्षी राणीसाहेब विधवा झाल्या, त्यावेळी त्यांचे वय अवघे १८ वर्षे होते.

**इंग्रजांविरुद्ध उठाव आणि अतुलनीय पराक्रम**

राणी लक्ष्मीबाई यांचा इंग्रजांनी पदोपदी अपमान केला. ७ मार्च, १८५४ रोजी झाशी संस्थान खालसा केले आणि तिचा दत्तक वारसही नामंजूर केला गेला. राणीसाहेबांचा संताप अनावर झाला आणि त्या समशेर उपसून गरजल्या, 'मेरी झाँसी नहीं दूँगी।'

राणीसाहेबांचे वय जरी लहान असले, तरी संस्थानचा कारभार व्यवस्थित करण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी होते. त्यांची दिनचर्या अगदी आखीव होती. भल्या पहाटे उठावे, स्नान करावे. बहुधा शुभ्र चंदेरी साडी त्या परिधान करी. पूजाअर्चा, पुराणश्रवण झाल्यावर येणारे सरदार, आश्रित मंडळींना त्या भेटत. भोजनोत्तर विश्रांती घेऊन पुरुषवेष धारण करून त्या दरबारात जात. दिवाणी व फौजदारी खटले त्या आपल्या बुद्धी कौशल्याने सोडवत. दर मंगळवारी व शुक्रवारी त्या महालक्ष्मीच्या मंदिरात दर्शनासाठी जात. लक्ष्मीबाई शूरवीर होत्या. त्यांच्या राज्यात अनेक तोफा व बंदुका होत्या. घोडदौडीची त्यांना आवड होती व त्यांची अश्वपरीक्षाही अचूक होती.

त्याकाळी संपूर्ण देशात ब्रिटिशांच्या सत्तेविरुद्ध वातावरण होते. लोकांच्या मनात आग उसळत होती. दिल्ली, आग्रा, कानपूर, अयोध्या, अलाहाबाद, अंबाला, मीरत, लखनऊ, नसीराबाद इत्यादी ठिकाणच्या इंग्रजी सत्ता या देशातून उखडून टाकण्यासाठी हजारो शिपाई तळहातावर शीर घेऊन निघाले होते. त्यांचे नेते नानासाहेब पेशवे आणि तात्या टोपे होते. नानासाहेबांची बालपणीची मैत्रीण 'छबेली' म्हणजे राणी लक्ष्मीबाई हिनेही स्वदेश, स्वधर्म आणि स्वबांधवांसाठी १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात उडी घेतली.

४ एप्रिल, १८५८ पर्यंत सर ह्यू रोजशी राणीने यशस्वीपणे सामना करून झाशीचे स्वातंत्र्य टिकवले. इंग्रज सैनिकांनी राणी लक्ष्मीबाईंवर वार केला. यात त्यांचा डावा डोळा बाहेर आला. पुढे छातीवर वार केला. पण, तशाही अवस्थेत घाव घालणाऱ्यांना त्यांनी यमसदनी पाठवले. शेवटी त्या घोड्यावरून खाली आल्या. शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत त्यांनी इंग्रजांशी झुंज दिली. याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते.

जिवंतपणी नाहीच पण मेल्यावरही आपल्या शरीराला शत्रूच्या हाताचा स्पर्श होऊ नये, अशी त्यांची इच्छा होती. त्याप्रमाणे त्यांनी गवताच्या शय्येला आणि गंगादासबाबांच्या झोपडीला आग लावली. शत्रूला काही कळायचा आतच १८५७ च्या स्वातंत्र्यसमरातील ही तेजस्वी दीप्तीमान ज्वाला अग्नी ज्वालांसमवेत शहीद झाली. तो दिवस होता १८ जून, १८५८. देशाच्या रक्षणासाठी व स्वातंत्र्यासाठीच्या यज्ञात राणीने स्वतःची आहुती दिली, अवघ्या २२ व्या वर्षी!

- अंकिता देशमुख
११ वी (वाणिज्य)

## खबर नहीं उसको

उसको खुद की खबर नहीं।
आँखें है, पर नजर नहीं।।
हद होती है जुगाड़ की
उसका अपना हुनर नहीं ।।
खुद को खुद ना तलाश पाएँ,
पत्थर है, कोई बशर नहीं।
बिन मिट्टी के जड़े जमा लें,
सपना ही है, शफर नहीं।।
साहिल तक जाने की ख्वाहिश,
रोक सके वो लहर नहीं।।
दुनिया की मर्जी से बाहर,
होता कोई अमर नहीं।।



- शीतल ठाकरे
बी.ए. भाग-१

## माँ का प्यार...

दुनिया में कुछ पाना चाहते हो तो,
माँ का प्यार पाओ।
दुनिया में किसी का दिल जितना चाहते हो,
तो गुरू का दिल जीतो।
दुनिया में किसी को छोड़ना है तो,
बुरी लत छोड़ो।
दुनिया में कुछ निभाना चाहते हो तो,
सच्ची दोस्ती निभाओं।
दुनिया में अगर जिना चाहते हो तो,
दुसरों को जीने दो।



- ज्योती श्रीबेल
बी.कॉम. भाग-१ (इंग्लिश)





Scanned with OKEN Scanner



## कर्तबगार आणि दानशूर

# अहिल्याबाई होळकर

मराठवाडा प्रांतातील बीड जिल्ह्यातील आष्टी तालुका. या तहसील भागात सीना नदीच्या काठावर चौंडी-चापडगाव हे गाव आहे. माणकोजी शिंदे हे गृहस्थ या गावाचे पाटील होते. त्यांना झालेले कन्यारत्न म्हणजेच अहिल्याबाई. अहिल्याबाईचे लग्न होळकर कुटुंबात झाले आणि अहिल्याबाई शिंदे या लग्नानंतर अहिल्याबाई होळकर झाल्या.

पेशवे बाजीरावांनी मल्हाररावांना त्यांच्या कर्तबगारीचे बक्षीस म्हणून पाचशे स्वारांची सरदारकी दिली. त्याच वर्षी चौंडी-चापडगावला माणकोजी शिंदेंच्या घरी अहिल्याबाईचा जन्म झाला. अहिल्याबाईचा जन्म झाला, त्यावर्षी मल्हाररावांना भरपूर प्रतिष्ठा मिळाली. अहिल्याबाईचा जन्म झाला, त्यावर्षी (१६२५) मल्हारराव ३२ वर्षे वयाचे होते. वयाच्या तिसाव्या वर्षी मल्हाररावांना पुत्रप्राप्ती झाली.

अहिल्याबाई मल्हाररावांची सून म्हणून त्यांच्या घरात आल्या. त्याचवर्षी मल्हाररावांना इंदूर संस्थानची जहागिरी प्राप्त झाली. पण, या आधी इ. स. १६२८ ला नर्मदा नदीच्या उत्तर दिशेला बारा परगण्यांची जहागीर व इ. स. १६३२ ला चौऱ्यांशी परगण्यांची जहागिरी पराक्रमाचे बक्षीस म्हणून प्राप्त झाली होती.

अहिल्याबाईच्या आयुष्यातील हे आनंदाचे, सुखाचे दिवस अगदी भराभर गेले. इ. स. १६५३ पर्यंत हा आनंद राहिला. त्यानंतर मात्र जसा आकाशमालेतील सूर्यही ग्रहणापासून सुटला नाही, तसे अहिल्याबाईच्या सुखी, आनंदी संसाराला ग्रहण लागले. पेशवा बाळाजींचा धाकटा भाऊ रघुनाथबरोबर खंडेरावांची मोहीम होती. कुम्हेरच्या किल्ल्याला लक्ष्य बनवण्यात आले. या रणसंग्रामावेळी अहिल्याबाई आणि मालोजीरावही त्यांच्यासोबत होते.

अहिल्याबाईना यावेळी भविष्यातील एक वेगळीच काळजी वाटत होती. दौलतीचा वारस मालोजीराव आजोबांप्रमाणे कर्तृत्ववान नव्हता. परिणामी, भविष्यात जहागिरीचा कारभार आपणालाच अधिक लक्षपूर्वक पाहावा लागणार आहे, अशी सुस्पष्ट चिन्हे अहिल्याबाईना दिसत होती. मल्हाररावांनंतर जहागिरीवर डोळा असलेले शत्रूही डोके वर करू पाहत होते.

अहिल्याबाईमधील कर्तबगारीचे गुण पाहता आणि मल्हाररावांवरील निष्ठा कायम ठेवून मदतीचे आवाहन ज्यांना प्राप्त झाले, ते ताबडतोब मदतीसाठी हजर झाले. शत्रूला पळता भुई थोडी करायची, असा आदेशच दिला; अन्यथा शत्रू सर्वांचे हालहाल करील, ही स्थितीही त्यांच्यासमोर स्पष्ट केली.

**लोकप्रिय कारभार :** जहागिरीच्या कारभारावर डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवावे लागणार, हे अहिल्याबाई चांगलेच जाणून होत्या. शत्रू जहागिरीचे लचके तोडायला टपून आहेत, हेही त्यांनी जाणले होते. परिपक्वतेमुळे, अनुभवामुळे अहिल्याबाई राज्यकारभार करण्यासाठी सरावलेल्या होत्या. त्यांनी राजधानीसाठी इंदूरपासून पन्नास मैलांवरील असलेल्या महेश्वरला निवडले कारण येथून राज्यकारभार करणे सोयीचे होते. बाईंनी राज्यकारभारात दूरदृष्टीपणा वापरून जहागिरीत स्वदेश, खानदेश, माळवा, धुदांड, नेयाड, जातवाड, हाडोळी, नरवर, मेवाड, अंतर्वेद व बुंदेलखंड या प्रांतांच्या कारभाराची व्यवस्था त्यांची विभाग पाडून केली.

**धार्मिक जीवन :** अहिल्याबाई धार्मिक वृत्तीच्या असल्यामुळेच राज्यकारभाराची घडी व्यवस्थित बसवत असतानाच त्यांनी पूजाअर्चा, दानधर्म यांकडे जराही दुर्लक्ष केले नाही. जीवनात कितीही दुःखे आली तरी त्या शिवभक्त होत्या. बारा ज्योतिर्लिंगांपैकी त्यांनी पाच ज्योतिर्लिंगांचा जीर्णोद्धार केला. मनकर्णिका घाट, दशाश्वमेध घाट त्यांनीच बांधले. अशीच अनेक ठिकाणी मंदिरे, धर्मशाळा बांधल्या.

अहिल्याबाईंचे विशेष कार्य म्हणजे त्यांनी तीन हजार फूट उंचावर असलेल्या केदारनाथला धर्मशाळा बांधल्या. तसेच पाण्याचे कुंड बांधले. पूजेसाठी ब्राह्मण उपलब्ध करून दिले.

सर जॉन माल्कम या इतिहासकाराला अहिल्याबाईंचे कार्य बघून आश्चर्य वाटले. दान-धर्म करण्यात अहिल्याबाई प्रसिद्ध होत्या. ब्राह्मणांना, गोर-गरिबांना दान करण्यात त्यांनी कधीच हात आखडता घेतला नाही. सणवारानिमित्त त्या कापड दान करायच्या. असे अनेक समाजकार्य अहिल्याबाई होळकर यांनी केले.

- **महिमा दुधकवर**
वर्ग - ११वा (कला)

## ब स न्त

बसन्त तुम आते थे
हरियाली लाते थे।
चम्पा, चमेली संग
गेंदा भी फुले थे
अमुआ की डाली पर
डाले फिर झुले थे।
बहती थी मस्त पवन
झुम उठे पागल मन
मोर भी नाचा था
वन में मयुर संग
स्वागत में गीत कोई
कोयल भी गाती थी
पत्तों के झुरमुट से
कुहू-कुहू धून आती थी।
क्यों नहीं लगता अब
जैसे तुम आये हो...

हरियाली मस्त पवन
संग नहीं लाये हो।
अब कहाँ आऊँ मैं?
कट गए वृक्ष सब
कहाँ ठहर जाऊँ मैं?
हरेभरे जंगल सब
तुमने तो काट दिए
घर मेरा उजाड़ कर
अपनों में बाँट दिए।
दुखी है मेरा मन
कुछ तो दुख बांटो
जंगल ही जीवन है
जंगल को मत काटो।
मेरे घर, आँगन को
फिर से बसाओगे
बंजर इस धरती पर

हरियाली लाओगे
अब तो मैं आऊँगा
वृक्ष जब लगाओगे।

- **आकाश मुंडवाईक**
बी.ए. भाग-१







Scanned with OKEN Scanner



## विदर्भातील अलौकिक रत्न
# राजमाता जिजाऊ

विदर्भ ही रत्नांची खाण आहे. याच विदर्भात एक अलौकिक रत्न जन्माला आलं. तिच्या जन्माने इतिहासाला कलाटणी मिळाली. विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात सिंदखेडराजा हे इतिहासप्रसिद्ध गाव आहे. या गावाला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. देवगिरीच्या यादव सम्राटाचे वंशज इथलेच. शिवपूर्वकालातील अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी इथेच घडल्या. शिवतीर्थच्या नामावलीत सिंदखेडला आगळंवेगळं महत्त्व आहे. अशा या पावनभूमीतच राजमाता जिजाऊंचा जन्म झाला.

